# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००० |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३६**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक
# दिशा
वर्ष चौथे / अंक १० / एप्रिल २०००

# संपादकीय

## 'दिशा' ची वाटचाल

या महिन्यात 'दिशा' च्या नवीन संपादक मंडळाला एक वर्ष पुरे होत आहे. प्रत्येक महिन्याला पुढील अंक असाच वेळेवर निघाला पाहिजे असे महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारच्या सभेत प्रत्येक सभासदाने ठरवून वर्षभर आम्ही अंक पहिल्या आठवड्यात काढला. मार्च २००० चा अंक मात्र काही अपरिहार्य कारणामुळे दुसऱ्या आठवड्याच्या सुरुवातीला निघाला. त्याबद्दल झालेल्या वाचकांच्या गैरसोयीबद्दल क्षमस्व ! पुन्हा इतका अंकाला उशीर होऊं नये यावर उपाय या महिन्याच्या सभेत चर्चिले गेले. शक्यतो असे होऊ नये यावर सर्व सभासदांचे एकमत आहे. मग त्यासाठी काही कटु निर्णय घ्यावे लागतील.

गेल्या वर्षी संपादक मंडळात झालेला बदल हा तसा म्हटल तरं अचानकच होता. त्यामुळे केवळ विद्या प्रसारक मंडळाचे चांगले कार्य बंद होऊ नये या दृष्टीने कार्हींची नाराजी पत्करुनही मी 'दिशा' नियतकालिक चालू ठेवण्याची जबाबदारी स्वत:वर घेतली व इतर कामाचे व्याप संभाळून मी ती पार पाडीत आहे. अर्थात त्यासाठी मला कार्यकारी संपादक प्रा. मोहन पाठक, सह संपादिका सौ. दांडेकर, इतर सभासदांपैकी सौ. देशपांडे, सौ. देवधर, कु. भाटकर, श्री. बोरकर, सौ. सावंत यांची अतिशय मोलाची मदत होते. इतर सभासदांकडूनही अशीच मदत अपेक्षित आहे. जेव्हा नियतकालिक चालविण्यास घेतले तेव्हा सभासद संख्या कमी होती. आज सभासद संख्या कितीतरी वाढली आहे. विद्यार्थ्यांना यात कसे समावून घ्यावे याबद्दल विचार चालू आहे. विभाग प्रमुख व आमचे सभासद यांच्या प्रयत्नाने ते शक्य होईल. जाहिराती मिळविणे व वेब साइट वर 'दिशा' घेणे हेही आमच्यापुढील आणखी दोन प्रश्न आहेत.

वर्षभर लेखांची कमतरता कधीच जाणवली नाही व पहिल्या अंकात सांगितल्याप्रमाणे विविध विषयावरील लेख देता आले. प्रसिद्ध व्यक्तींमध्ये इतिहासकार मा. श्री. बाबासाहेब पुरंदरे, मराठी रंगभूमीवरील दिग्दर्शक, नट श्री. प्रभाकर पणशीकर, विख्यात तबलावादक श्री. भाई गायतोंडे, गझल गायक अनिरुद्ध जोशी, राष्ट्रीय बुद्धिबळ खेळाडू, शिक्षक व संघटक श्री. भाऊ पडसलगीकर, ऑलिंपियाडमध्ये रौप्यपदक विजेता श्री. संदीप बाला, आंतरराष्ट्रीय बोध चिन्हकार शांताराम राऊत, शिवछत्रपती पुरस्कारांनी गौरविलेले श्री. मंगेश इंगळे यांच्या मुलाखती आम्हाला मिळाल्या. त्या घेणाऱ्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच होईल. आणखी काही आपआपल्या क्षेत्रात प्रसिद्ध असलेल्या व वैयक्तिक गौरव

मिळालेल्या श्री. नारायण काळे, प्रा. उषा तांबे, कु. सौरभ चुबे वगैरेच्या मुलाखतीही आम्ही रसिकांना देऊन त्या व्यक्तींच्या कार्यांची किंवा मिळालेल्या बुहमानाची माहिती करून दिली.

सांज लोकसत्ताचे माजी संपादक श्री. चंद्रशेखर वाघ, श्री. अनिल शाळीग्राम, श्री. प्रशांत देशपांडे, कला महर्षी श्री. व्ही. सित्ररकर, लेखक श्री. अरविंद दोडे, प्रा. प्रदीप कर्णिक, डॉ. अरुण जोशी, प्र.ग. वैद्य, प्रा.सौ. सुषमा पौडवाल, सौ. सुनीता खरे यांनी खास 'दिशा' साठी दिलेल्या लेखांबद्दलही आम्ही त्यांचे आभार मानतो. लेखांच्या विषयातही विविधता होती व सर्व महत्त्वाचे होते. त्यामध्ये पत्रकारितेपासून, पर्यावरण, साहित्य, शिक्षण, दत्त संप्रदाय, ब्रह्मविद्या, परदेश दौऱ्यांचे प्रवासवर्णन, व्यायाम, क्रीडा, नाटक, गायन, चित्रकला, ग्राहक चळवळ, कारगिल युद्ध, एडस् इत्यादी विषय होते. दिवाळी अंकाला तर प्रसिद्ध व्यंगचित्रकार वसंत सरवटे यांनी दिलेल्या व्यंगचित्रामुळे शोभा आली. त्या दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ सहसंपादिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी अतिशय सुरेख रेखाटले. लघुवाद न्यायालयाचे माजी न्यायाधीश श्री. बेळवी यांचा कै. लोकमान्य टिळकांवरील उत्कृष्ट लेख आम्हाला उपाध्यक्ष श्री. श्री.बि. कारंदीकर यांच्यामुळे मिळाला. श्री. वसंत सरवटेनांही त्यांनीच व्यंगचित्र देण्यास उद्युक्त केले. 'दिशा' ला ते देत असलेल्या उत्स्फूर्त सहकार्याला तर तोडच नाही. श्री. रविंद्र मांजरेकर या माजी विद्यार्थ्याने पण आम्हाला वेगवेगळ्या विषयांवर माहितीपूर्ण लेख देऊन मदत केली आहे. संपादकीय मंडळ ते कधीच विसरणार नाही. तसेच अंकाची दर महिन्याला कुठपर्यंत छापून आला याबद्दलची चौकशी करणे, लेख नोंदवून प्रेसमध्ये पाठवणे, प्रूफ तपासल्यावर परत पाठविणे. थोडक्यात प्रेस व 'दिशा' संपादक मंडळ यांच्या मधील दुवा असलेल्या मंडळातील सर्वात जुन्या लेखनिक सौ. ज्योती जोशी यांच्या सहकार्याबद्दलही त्यांना विशेष धन्यवाद !

विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयातील व्याख्याते श्री. बुटाला यांनी 'दिशा' नियतकालिक रजिस्टर करण्यासंबंधी मंडळाला मदत देऊ केली आहे. ठाणे व नवी मुंबई येथील रजिस्ट्रेशन कार्यालयातील कामे पुरी करून ते आता दिल्लीला स्वतः जाऊन ते पुरे करून येणार आहेत. आम्ही त्यांचे कितीही आभार मानले तरी ते कमीच होतील. रजिस्ट्रेशन मुळे आम्हाला कागद थोडासा स्वस्त मिळेल व आम्ही 'दिशा' इतर शाळा, महाविद्यालयातून वर्गणी घेऊन पाठवू शकू किंवा बाहेर दुकानातूनही विक्रीस ठेऊ शकू. अर्थात ते नजिकच्या काळात निश्चित असल्यामुळे आम्हाला 'दर्जा' वर व अंक वेळेवर मिळण्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. वर्षभर वाचकांना काही शुद्धलेखनाच्या व छपाईच्या चुका सोडता दर्जेदार विचारांचे लेख देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे व यापुढेही तो करू. याक्षणी मला कवी बा.भ. बोरकर यांच्या 'चिरंतनाचा ध्यास' या कवितेमधील कांही ओळी आठवतात.

जे जे देवे दिधले हाती
खडे, कोळसे अथवा माती
त्यांतुनि त्याच्या स्वप्नमूर्तिचा घडवू उदय विकास

संकल्पाचे वरिता कंकण
स्वर्गाचेहि न आम्हां विलोभन
निर्मू नूतन स्थान दिगंती वितरित ध्रुवप्रकाश

त्या सेवेचा मणी बांधिला
सतिसम जीवन वाहु त्याजला
ती अपुरी तोवरी विटेवरि तिष्ठवु भगवन्तास

मौनी अमुच्या मंत्र मुक्तिचे
तपात अमुच्या सृजन शक्तिचे
कोमल करुणेतुनी कलांचा द्विव्यानंदविलास

सर्व सभासद, जाहीरातदार, हितचिंतक, विद्या प्रसारक मंडळाची कार्यकारिणी या सर्वांचे आभार. मे. परफेक्ट प्रिण्टस्च्या श्री. विलास सांगुर्डेकरांचे सहकार्याबद्दल विशेष आभार.

अचलकुमार दिक्षित
संपादक

• • •

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष चौथे / अंक १० / एप्रिल २०००

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
प्रा. संतोष राणे
सौ. भारती जोशी
सौ. मंगला घाटणेकर
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
श्री. संजय बोरकर
सौ. विनोदिनी राणे
सौ. सुलक्षणा पाध्ये
कु. दीपाली भाटकर
कु. सुगंधा चव्हाण

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ११

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | |
| २) | वृध्दाश्रम हा उपाय योग्य की अयोग्य | श्री.अ.वि. सहस्त्रबुद्धे | ३ |
| ३) | "हे कुणी कुणाला सांगावे?" | श्री. श्रीराम कृ. बोरकर | ८ |
| ४) | सरत्या सहस्त्रकातील सर्वात महान व्यक्ती | श्री. रविंद्र बि. मांजरेकर | १० |
| ५) | कोचिंग क्लासेस -एक आत्मपरीक्षण | मंजुषा दांडेकर | १४ |
| ६) | संगणक पदव्युत्तर अभ्यासक्रमातील एक घटक: आकलन आणि परावर्तन | श्री. रावसाहेब बोरसे | १६ |
| ७) | राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीतून माझा देश | श्री. सुहास साठे | १९ |
| ८) | सारीपाट | श्री. राजेश राणे | २३ |
| ९) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ३३ |

सुविचार संकलन : श्री. वासुदेव देशपांडे यांनी केले आहे

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

चांगले अंतःकरण सोन्याच्या किंमतीचे असते.

# वृध्दाश्रम हा उपाय योग्य की अयोग्य ?

**श्री. अ.वि. सहस्त्रबुध्दे**

*(वृध्दांची घरात अडगळ होते ही सामाजिक समस्या आहे. अर्थार्जन क्षमता संपली, गात्रे शिथिल झाली की ही समस्या उग्र रूप धारण करते. मग निर्माण होतात वृध्दाश्रम. वृध्दाश्रम हा उपाय आहे, पण योग्य आहे का..... या दृष्टीने या लेखातील विचार अंतर्मुख करणारे आहेत. - संपादक)*

*प्रस्तावना - डिसेंबर १४ मधील गोष्ट. शाळेच्या एका वर्गाची सहल समाजसेवा विषय प्रकल्पाखाली बदलापूर बारवी धरण पाहण्यासाठी गेली होती. जाताना बदलापूरचा वृध्दाश्रम ही बघावा व जमल्यास विद्यार्थ्यांना वृध्दाश्रमात राहणाऱ्यांची मुलाखत घेण्यास सांगावे असे ठरले. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मुलाखती ऐकत असताना व वृध्दाश्रम पाहताना मन हेलावून गेले. सामाजिक परिस्थिती किती झपाट्याने बदलते आहे हे जाणवले. विभक्त कुटुंबपद्धतीचा परिपाक म्हणून वृध्दाश्रम ही काळाची गरज होत असली तरी वृध्दांना ही जागा खऱ्या अर्थाने आश्रम म्हणून भावते का? हा प्रश्नाचा भुंगा डोक्यात वळवळतच राहिला.*

या लेखाच्या निमित्ताने या प्रश्नाने आज पुन्हा उचल खाल्ली व त्यातूनच सुचलेले हे विचार.

वृध्द कोण ? - वयाची ५८ ते ६० वर्षे पूर्ण झाली म्हणजे नियमाप्रमाणे नोकरी करणारी व्यक्ती सेवानिवृत्त होते. बऱ्याच वेळा सेवानिवृत्तीनंतर इच्छा असो वा नसो काही वेळा माणूस पुन्हा स्वतःला नोकरीसमान कोणत्या तरी कामात गुंतवून घेतो. पण हे सर्वांनाच शक्य नसते.

नोकरीत असतानाच माणसाला एखादा छंद नसेल, अन्य कशाची आवड नसेल तर अशा व्यक्तीस निवृत्तीनंतर एकदम पोकळी जाणवते. त्याचा परिणाम बऱ्याच वेळा नोकरीत असलेला माणूस निवृत्तीनंतर शारीरिक दृष्ट्या थकत जातो.

शारीरिक दुर्बलता व कामातून मिळालेले रिकामपण यामुळे माणसाला वृध्दत्व जाणवू लागते. पैसे न मिळविणारा माणूस (मग कितीही जवळचा असला तरी) हळू हळू घरच्यांना जड वाटू लागतो व मग समोर दिसू लागतो वृध्दाश्रम.

**वृध्दांचे प्रश्न :** वृध्दत्व ही केवळ शारीरिक स्थिती न राहता मानसिक कमकुवतपणाही त्यातून पुढे येतो व वृध्दांचे अनेक प्रश्न त्यातून निर्माण होऊ लागतात. वृध्दांच्या प्रश्नांचे सर्वसाधारण स्वरुप खालीलप्रमाणे असते.

१) नको ते विचार रिकामपणामुळे वृध्दांना अस्वस्थ करू लागतात. सर्व सामन्याप्रमाणे वृध्दांना आत्मविश्वास कमी झाल्यामुळे प्रत्येक गोष्टीची काळजी सतावू लागते.

आपल्या सहचारिणीची तब्बेत नीट राहील का नाही? तिचे व सुनेचे जमेल का नाही ? मुलगा आपल्याशी शेवटपर्यंत नीट वागेल का ? नातवाला शाळेत प्रवेश मिळेल का? जावई मुलीला नीट सांभाळेल का ? मुलगे आपल्या पाश्चात् न भांडता एकत्र राहतील का त्यांचे संबंध दुरावतील ? अशा एक ना अनेक विवंचना वृध्दांना सतावू लागतात. 'इदं न मम' अशा वृत्तीची जोपासना ज्यांनी केली असेल तेच याला अपवाद ठरतात.

स्त्रियांच्या बाबतीत सांगायचे तर सुना, जावई आले तरी स्त्री स्वतःला संसारातून कधीच मुक्त करुन घेत नाही. मुलांचे केले नसेल एवढे नातवंडांचे करण्यात त्या धन्य

---

अत्यंत महत्त्वाच्या घटना अनेकदा किरकोळ गोष्टींतून उद्भवतात.

मानतात किंवा बऱ्याच वेळेस ते काम त्यांना स्वीकारावेच म्हणून लागते. आई रिटायर होते का? असा खरच प्रश्न पडतो पण त्यामुळे काळजी करण हा वृध्द स्त्रियांच्या मनाचा भागच होऊन राहतो व त्यामुळे स्त्रिया घरकाम करतात तोपर्यंत त्या वृध्द ठरत नाहीत पण हातपाय चालेनासे झाले की मग त्यांनाही वृध्दाश्रमाची वाट इच्छा असो वा नसो आक्रमावीच लागते.

२) घरात सासू म्हणून स्त्रीला आणि नोकरीत पुरुषांना वा स्त्रियांना अधिकारी म्हणून काम करण्याची सवय असेल तर कळत-नकळत अशा व्यक्तींमध्ये एक गंड तयार होतो त्याला 'Superiority Complex' म्हणून समजले जाते. अशा व्यक्तिंना निवृत्तीनंतरही हा गंड पछाडत राहतो व आपण म्हणू तसेच घरात व्हावयास हवे असे त्यास वाटू लागते.

सोळा वर्षाचा मुलगा वा मुलगी ही मित्राप्रमाणे असावी या अर्थाचे सुभाषित पुस्तकात राहते व प्रत्यक्ष आपली अधिकाराची वृत्ती सोडण्यास तयार नसेल तर कुटुंबात संघर्षास सुरवात होते. संघर्ष विकोपास गेले, पिढीतील अंतर वृध्दांनी जाणून घेतले नाही तर नाईलाजाने तरुण रक्त वृध्दाला वृध्दाश्रमाचा मार्ग धरण्यास भाग पाडते.

३) **पिढीतील अंतर न जाणणे** - सेवानिवृत्त झालेल्या किंवा वृध्दत्वाकडे वाटचाल सुरू केलेल्या व्यक्तीने जुन्या व नव्या पिढीतील अंतर जाणून घेणे महत्वाचे ठरते. आपण जसे वागलो तसेच नवीन पिढीने वागावे अशी अपेक्षा करणे रास्त ठरत नाही. पिढीतील अंतर जाणून घेऊन मतभेदाचे मुद्दे टाळले तर वृध्दांना घरात सूर जुळवून घेणे कठीण जात नाही. पण हे लक्षात कोण घेतो ?

४) आपल्या शारीरिक क्षमतांचा विचार करून केवळ स्वत:चाच विचार न करता कुटुंबाचा विचार करून आपला कुटुंबाचे कामात जरुर तेवढा सहभाग देणे आवश्यक आहे. हा विचार सर्वच वृध्द करीत नाही व मग केवळ स्वार्थी वृत्तीने वागणारा वृध्द घरातील इतरांना डोकेदुखी होतो.

५) **आर्थिक भार कुटुंबावर न लादणे** - बदलत्या सामाजिक परिस्थितीचा विचार करून प्रत्येक वृध्दाने आपला आर्थिक भार कुटुंबावर पडणार नाही या दृष्टीने आर्थिक नियोजन करणे आवश्यक आहे. आपला(आपल्यावर अवलंबून असल्यास) आपल्या पत्नीचा आर्थिक भार मुलावर/सुनेवर पडणार नाही याची काळजी वृध्दांनी घेणे आवश्यक ठरते. बऱ्याच वेळा शारीरिक भार उचलण्यास कुटुंबाचे घटक तयार होतात पण आर्थिक भारही पडत असेल तर वृध्दास आपल्यापासून दूर कसे ठेवता येईल असा विचार सुरू होतो.

६) **लहान मुलात नातवंडात न गुंतणे** मानसिकरीत्या आपल्या नातवंडात गुंतत गेलो तर मुलाला, सुनेला आपल्यापासून मुले दूर जात आहेत असे वाटू लागते. आवश्यक तेवढीच जवळीक ठेवण्याचे पथ्य पाळावयास हवे. त्यामुळे होणारे संघर्ष टाळता येतात. वेळ आल्यास अलिप्त वृत्तीने नातवंडांपासून दूर जाणे कठिण जात नाही.

७) **कुटुंबात असून नसल्याप्रमाणे वागणे** - बऱ्याच वेळा वृध्द लोक प्रत्येक गोष्टीत आपला सल्ला देत राहतात व अनेक कौटुंबिक संघर्षांना त्यांना सामोरे जावे लागते. विचारला तरच सल्ला देणे हे धोरण ठेवल्यास आपण बऱ्याच समस्या सोडवू शकतो व घरातील तरुण रक्तही वृध्दांबाबत आदर ठेवून आवश्यक तेव्हा सल्ला घेतात.

**वृध्दांचे प्रश्न आज तीव्र का वाटतात ?**

वृध्दांचे प्रश्न आजच निर्माण झाले आहेत असे समजण्याचे कारण नाही. हे प्रश्न पिढ्यानपिढ्या चालत आलेले आहेत. आज त्यांची तीव्रता अधिक जाणवते कारण विभक्त कुटुंब पद्धतीने, वाढत्या औद्योगीकरणामुळे, शहरीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न. महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जागेचा. २/३ खोल्यांच्या ब्लॉकमध्ये ५/६ माणसांचे

---

वाईटाशी संबंध आला म्हणजे सभ्य चालीरीतीही बिघडतात.

कुटुंब रहात असेल तर त्यांना वृध्दास सामावून घेणे जड वाटू लागते. वृध्दांनाही थोडीशी लहान का होईना पण स्वतंत्र जागा असावी असे वाटते पण ते शक्य नसते व मग विचार सुरू होतो वृध्दाश्रमाचा. आर्थिक दृष्ट्या परावलंबित्व असेल तर हा प्रश्न अधिक प्रकर्षाने जाणवतो.

गावाकडे घर आहे पण घरी कोणी नाही अशी परिस्थितीही काही वेळेस असल्याचे आढळते. अशा वेळी शारीरिक दुर्बलता नसेल तर वृध्दांनी गावाकडच्या घरी जाऊन राहण्यास काहीच हरकत नसावी. नोकरी निमित्ताने सर्व वास्तव्य शहरात झाले असले तरी सर्वांची सोय होत असेल तर निवृत्तीनंतर वृध्दांनी स्वतंत्रपणे राहणे पसंत करावयास हवे. अर्थात गावाकडे जमीन वा घर अजुनही शिल्लक आहे असे वृध्द किती आहेत हाही महत्त्वाचा प्रश्न आहे.

स्वतःस काही छंदात गुंतवून घेण्याची सवय नसेल तर मग असे वृध्द कुटुंबात नको तितके लक्ष घालतात व हा प्रश्न तीव्र रूप धारण करतो.

धकाधकीपासून दूर, शांत व एकांत याची आवड असणारी व्यक्ती शहरापासून गावाकडे राहण्यास तयार झाली तर हा प्रश्न सुटण्यास काही प्रमाणात मदत होईल.

**वृध्दांचे प्रश्नांवर उपाय-**

आतापर्यंतच्या चर्चेत वृध्दांचे विविध प्रश्न आपण पाहिले, त्यावरील उपायांबाबत आता विचार करावयास हवा.

१) शक्य त्या शारीरिक मर्यादेपर्यंत वृध्दांनी (सेवानिवृत्त) अर्थार्जन शक्य असल्यास ते करावयास हवे. आपला आर्थिक भार कुटुंबावर न पडला तर बरेच प्रश्न सुटू शकतात. बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे हे करणे भाग आहे.

२) मानसिक व शारीरिक क्षमता टिकवून धरण्यासाठी प्रयत्नशील रहाणे, शारीरिक स्वास्थ्यासाठी योगासन हा चांगला उपाय होऊ शकतो. ठराविक वेळ मोकळ्या हवेत फिरल्याने व नियमित आहाराने आरोग्य टिकू शकते व मानसिक क्षमता टिकवण्यास अप्रत्यक्ष मदत होते.

३) **सामाजिक कार्यात सहभागी होणे** - विविध सेवाभावी कार्य करणाऱ्या संस्थांना मनुष्यबळाची आवश्यकता असते. आपला वेळ अशा संस्थांना दिल्याने आपण काही अंशी सामाजिक ऋण फेडत आहोत याचे समाधानही मिळते. अशा संस्थात आपल्या आवडीचे काम आपण निवडू शकतो. आवश्यक वाटले तर घरापासून दूरही राहू शकतो व आपला प्रश्न आपणच सोडवू शकतो. सेवाभावी संस्थांनीही अशा वृध्दांना योग्य काम देऊन वृध्दाश्रमाला पर्याय देण्यास काहीच हरकत नसावी. अर्थात हे सर्व आपण शारीरिक दृष्ट्या स्वावलंबी आहोत तोच करणे योग्य ठरते. कुटुंबापासून काही काळ दूर राहिल्याने कुटुंबातील अन्य घटकांनाही आपला आवश्यकता जाणवू लागते. विरहाने आपुलकी, प्रेम वाढण्यास मदत होते.

ज्येष्ठ नागरिक संघटना, विविध धार्मिक कार्य करणारी मंडळे, सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था, अपंगांसाठी, मतिमंदांसाठी, अंधलोकांसाठी आदिवासींसाठी कार्य करणाऱ्या आज अनेक संस्था आहेत त्यांना मनुष्यबळाची (सर्व वयोगटातील) आवश्यकता असते. वानप्रस्थाश्रम स्वीकारणाऱ्यांना तर या संस्था नेहमीच खुणावत असतात.

४) लेखन वाचन करून समाज प्रबोधनासाठी, बालमनावर संस्कार करण्यासाठी, युवकांना मार्गदर्शन करण्यासाठी सातत्याने लेखन करणे हेही काम वृध्दांना करणे शक्य आहे.

५) मानवी जन्म हा फार दुर्लभ आहे. असे मानतात. हा जन्म मिळाला तर जन्माचे सार्थक करून घेण्याचा प्रयत्न

---

सभ्य म्हणजे काळजीपूर्वक रक्षण केलेला खोटेपणा.

प्रत्येकाने करावयास हवा. हे काम तरुण वयापासून करणे अपेक्षित असले तरी त्याची आवड तरुण वयात लावून घेतली तर आत्मिक विकासाचे उरलेले काम निवृत्तीनंतर करावयास हवे.

वाचन, मनन, चिंतन व आचरण हे अध्यात्म प्रवासाचे टप्पे आहेत. मनावर ताबा ठेवून त्याला अंकित ठेवण्याचे फार महत्त्वाचे काम वृध्दांनी आपलेसे करावयास हवे. मन जिंकणारा कुटुंबातील समस्यांवर सहजपणे उपाय शोधून काढू शकतो व आपली अडगळ न वाटता कुटुंबात राहण्याची कला अध्यात्माने त्यास सहज साध्य होऊ शकते.

याचि देही याचि डोळा मुक्ती साधणे कठीण नाही पण त्यासाठी अध्यात्माची बैठक हवी व ती विकसित करण्याची इच्छा व शक्ती व कृती वृध्दपणी करावयास हवी. वृध्दावस्थेत शारीरिक दुर्बलतेने वास मर्यादा येतात. पण तरीसुद्धा मनोबलाने या अडचणींवर मात करणे शक्य असते.

६) कुटुंबात राहूनही अगदी आपल्या अवती भोवतीच्या लोकांसाठी वृध्दांना लहान सहान कामे करणे शक्य असते. त्यातून अर्थार्जनही होऊ शकते. रोग्याकडे लक्ष ठेवणे, पास काढून देणे, किरकोळ खरेदी करून देणे, विजेची बिले भरणे, टेलिफोन बिले भरणे अशा अनेक लहान कामांची यादीच देता येईल व शहरवासियांना अशा कामांना नेहमीच सहकार्य हवे असते. वृध्दांनी ही कामे अल्प मोबदल्यात केली तरी समाजसेवेचे काही अंशी समाधान, वेळ योग्य प्रकारे वापरल्याचे समाधान, शारीरिक दृष्ट्या योग्य राहण्यास मदत, कुटुंबातील व्यवहारापासून अलिप्त राहण्याची सवय असे अनेक फायदे वृध्दांना होऊ शकतात.

वृध्दांच्या प्रश्नांवर उपाय मांडतांना आतापर्यंत स्वतः वृध्दांनी काम करावयास पाहिजे ते लिहिले. आता कुटुंबातील अन्य घटकांनी वृध्दांबाबत काय भूमिका असावी हे पहावयास हवे.

दोन पिढ्यांतील मतांचा फरक लक्षात घेऊनही कुटुंबातील अन्य घटकांनी वृध्दांशी वागताना ते दुखावले जाणार नाहीत याची काळजी घ्यावयास हवी. आवश्यक तेव्हा वडिलधाऱ्यांचा सल्ला घेतला तर आपणास घरात विचारले जाते ही भावना वृध्दांना सुखावह वाटते. प्रत्येक सल्ला मानलाच जावा असा आग्रह मात्र वृध्दांनी ठेवू नये.

शक्य असेल तेवढे वृध्दांना त्यांचा दिनक्रम ठरविण्याचे स्वातंत्र्य दिले जावे त्यामुळे घरातील आपले लक्ष कमी करण्यास त्यांना वाव मिळेल. कुटुंबात होणाऱ्या सण समारंभात वृध्दांना सामावून घेतले तर आपण कुटुंबात एकटे पडत चाललो आहोत अशी भावना त्यांच्यात निर्माण होणार नाही.

आर्थिक दृष्ट्या घरातील वृध्द व्यक्ती परावलंबी असेल तर कुटुंबातल्या अन्य व्यक्तिंनी अधिकच काळजी घ्यावयास हवी. पैसा नाही म्हणून किरकोळ गोष्टींसाठीही वृध्दांची कुचंबणा होते. हे टाळावयास हवे आपण परावलंबी आहोत हे दुःख वृध्दांना अधिक वृध्दत्वाकडे नेते.

जागेचा अभाव असेल तरच वृध्दांना वृध्दाश्रमात पाठवावे, अन्यथा शक्यतो कुटुंबात समावून घ्यावे. वृध्दांनीही आपला सहभाग कुटंबाकरिता योग्य प्रकारे द्यावयास हवा.

**वृध्दाश्रम हा उपाय योग्य की अयोग्य ? -** वरील सर्व चर्चेवरून आपण अशा निष्कर्षाप्रत येतो की शहरीकरण, औद्योगीकरण, विभक्त कुटुंब पद्धती या सर्वांमुळे शहरात तरी बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे वृध्दाश्रमांची आवश्यकता भासू लागली. वृध्दाश्रम पद्धत योग्य आहे का अयोग्य असे निश्चितपणे मत मांडणे कठीण आहे. कारण वृध्दांच्या शारीरिक व मानसिक गरजांचा विचार केला तर वृध्दाश्रम हा उपाय योग्य वाटत नाही. कारण सर्व वृध्दाश्रम हे आदर्श पद्धतीने चालवणे कठीण असते. कारण शेवटी हा प्रश्न आर्थिक पाठबळाशी निगडित आहे.

---

प्रत्यक्ष व्यवहार हा सर्वात चांगला शिक्षक असतो.

वृध्दावस्थेत मानसिक आधार हा महत्त्वाचा ठरतो. दिवसात थोडावेळ तरी आपल्याशी बसून कोणीतरी बोलावे असे वाटत असते. आपुलकीने बोलण्यामुळे वृध्दांना बराच दिलासा मिळतो. सर्वच शारीरिक व्याधी पूर्ण बऱ्या होणे वयोपरत्वे शक्य नसते पण मानसिक संतुलन असेल तर शारीरिक व्याधी सुसह्य होतात.

एकाकीपणाचा विचार वाढीस लागला तर वृध्द फार झपाट्याने पैलतीराच्या रस्त्याकडे खेचला जातो. आयुष्याची अखेर चांगली व्हावी असे प्रत्येकास वाटते. वृध्द त्यास अपवाद नव्हेत. म्हणून तरी मानसिक बल टिकविण्यासाठी वृध्द हा खऱ्या अर्थाने कुटुंबात राहणे आवश्यक वाटते.

**समारोप-** वृध्दाश्रमांची जरुरी असली तरी त्याचा सर्व स्तरावर पुरस्कार केला जाऊ नये. भारतीय संस्कृतीचे वेगळेपण कुटुंबात सर्वांना सामावून घेण्यात आहे. कुटंब विभागण्यात नाही.

धर्मग्रंथांनी मांडलेली तत्त्वे मातृदेवोभव, पितृदेवो भव ही केवळ पुस्तकातच राहिली तर आमच्या व पाश्चात्य संस्कृतीत फरक तो काय ?

वृध्दाश्रम हा त्या अर्थी आमच्या भारतीय संस्कृतीस शाप ठरू नये हीच इच्छा.

केवळ एक फॅशन म्हणून वृध्दाला वृध्दाश्रमाकडे पाठवले जाऊ नये. परिस्थितीच तशी असेल तर इलाज नाही.

पाश्चात्य देशात अनेक वृध्द सार्वजनिक ठिकाणी व अन्य ठिकाणी आपला वेळ घालवत एकटेपणाने जगत असतात. भारतीय मनाला हे पटेल असे वाटत नाही. म्हणूनच वृध्दाश्रम ही काळाची गरज म्हणून त्याकडे पाहिले जाऊ नये. आज वृध्दाश्रमात आई वडिलांना पाठवणारा मुलगा, नंतरच्या काही वर्षात वृध्द होणार असतो याचे तरी भान नको का ?

कुटुंब हे संस्काराचे खरे केंद्र आहे पण विभक्त कुटुंब पद्धतीमुळे व वाढत्या वृध्दाश्रमांमुळे या संस्कार केंद्रासच धक्का बसत आहे.

सारांशाने, खरे पाहिले तर वृध्दाश्रम ही समाजाची फॅशन होऊ नये. नाईलाज असेल तर एक सोय म्हणूनच त्याकडे पाहिले जावे.

**श्री. अ.वि. सहस्रबुद्धे**

(माजी मुख्याध्यापक)

डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.), ठाणे.

•••

*With Best Compliments From*

A WELL WISHER

पापी अंतःकरणाचे प्रतिबिंब चेहऱ्यावर न उमटू देणे किती अवघड असते !

# " हे कुणी कुणाला सांगावे ?"

**श्री. श्रीराम कृ. बोरकर**

*(सुखाच्या अविरत शोधात असूनही माणूस दुःखीच आहे. या मागे कारणे अनेक आहेत, असू शकतात. सदर लेखात या अनुषंगानेच मुक्तचिंतन आले आहे. - संपादक)*

जगाने नव्या सहस्त्रकात नुकताच प्रवेश केला. पुढील वर्षी हे जग व त्यातील मनुष्यजात एकविसाव्या शतकात पदार्पण करील. नव्या शतकाचे पडघम घुमू लागले आहेत. जगभरातले विचारवंत, तत्त्वज्ञ आणि पत्रपंडित चालू शतकाची फलश्रुती सांगतील.

गेल्या शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी आपण कुठे, कशा स्थितीत होतो आणि आज या घडीला कुठे येऊन ठेपलो आहोत असा प्रश्न प्रत्येक विचारी, संवेदनक्षम व्यक्तीच्या मनात उभा राहतो. या प्रश्नाचा शोध बोध घेणे म्हणजे एकप्रकारचे आत्मपरीक्षण (Introspection) होय. अर्थात, प्रस्तुत लेखाची स्थलमर्यादा लक्षात घेता, जागतिक घडामोडींचा सर्वांगीण वेध घेणे येथे शक्य नाही तसा हेतूही नाही. केवळ स्थूलमानाने पाहू गेल्यास, फ्रान्समधील राज्यक्रांती, इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती, दोन महायुद्धे, 'चांद्रभूमी' वर पडलेले मानवी पाऊल, अंतराळ संशोधनाचे पर्व आणि अलिकडे अवतीर्ण झालेले संगणकयुग अशा काही ठळक घटना डोळ्यांपुढे चटकन उभ्या राहतात.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर युरोपातील राजेशाहीचा- म्हणजे अनियंत्रित जुलमी एकाधिकारशाहीचा अस्त होत गेला व त्या जागी लोकसत्ताक राज्य पद्धतीची मुहूर्तमेढ रोविली गेली. समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व अशा उदात्त विचारांचे मोकळे वारे युरोपातून आपल्याकडे वाहू लागले. इंग्लंडमध्ये जी औद्योगिक क्रांती घडून आली तिचा अनिवार्य परीणाम म्हणून हळू हळू एका नव्या यंत्रप्रधान संस्कृतीचा जन्म झाला. हातांनी, शारीरिक कष्टांनी करावयाची कामे यंत्राच्या सहाय्याने होऊ लागली.

'चाक' आणि 'यंत्र' ह्या दोन वस्तूंचा अतिशय खोल परिणाम एकूण मानवी जीवनावर झालेला आहे. आधुनिक यंत्रप्रधान संस्कृतीचा विराट अविष्कार आज जगभर झालेला आहे. तिची बरी-वाईट फळे आपण चाखतो आहोत. दोन जागतिक महायुद्धांमधे प्रचंड संहार झाला. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानमधील 'हिरोशिमा', 'नागासकी' वर अणुबॉम्ब टाकून क्रौर्याची परिसीमा गाठली. युद्धोत्तर दूरगामी परिणाम ऐतिहासिक महत्त्वाचे ठरले. भारतापुरते पाहिले तर काय दिसते ?

महायुद्धानंतर येथील जुनी समाजव्यवस्था मोडून पडली. जुनी जीवनमूल्ये लोप पावली. जगण्याची रीत व धारणा बदलत गेली. पैसे मिळविण्याची साधने व गरजा वाढल्या. नवे अर्थकारण व तज्जन्य नवा अर्थकलह सुरु झाला. एकेकाळची 'स्वस्ताई' इतिहासजमा झाली. जीवन अधिकाधिक गतिमान, बुहढंगी आणि जटिल होत गेले.

अमेरिकेचा अंतराळवीर नील् आर्मस्ट्रॉंग 'अपोलो' यानासह 'चंद्रा' वर उतरला ही केवळ या शतकातलीच नव्हे तर मानवी इतिहासातील एक अभूतपूर्व घटना ठरली. अंतराळसंशोधनाचे पर्व उघडले. १९९१ मधे सोव्हिएट रशियाचे विघटन झाले आणि अमेरिका हीच जगातील एकमेव बलाढ्य महासत्ता बनली.

पदार्थविज्ञान, रसायन, वैद्यक, वनस्पती.... इत्यादी भौतिकशास्त्रांचा विकासही याच शतकात विशेषत्वाने घडून आला. आणि आता शेवटच्या दोन दशकात 'संगणका' च्या शोधाने पुन्हा एक नवयुग अवतरले

---

आहे. पाश्चात्यदेशांनी तर कॉम्प्युटर प्रणाली सर्रास व सर्वत्र झपाट्याने आत्मसात केली आहे. भारताने महानगरात, सार्वजनिक उद्योगधंद्यात आणि मोठ्या कंपन्यातून संगणक पद्धतीचे कामकाज करायला आरंभ केला आहे. माहिती तंत्रज्ञान (Information Technology) चहुदिशातून इकडे महापूर यावा तशा प्रचंड वेगाने येत आहे.

तात्पर्य असे की 'काल' च्या तुलनेने 'आज' चे जग सर्व बाबतीत अतिशय प्रगत, उन्नत आणि संपन्न बनले आहे. दूरध्वनी, दूरदर्शन, दूरसंदेशवहन, इंटरनेट, सायबर स्पेस, सॅटेलाईट.... अशा प्रकारच्या अत्याधुनिक सुधारणांमुळे जगातले दूरदूरचे नाना देश एकमेकांच्या जवळ आले. संपर्क सुलभ झाला. भौगोलिक अंतर कमी झाले. घरोघरी टी.व्ही. टेलिफोन, मोबाईल फोन, फ्रिज, वॉशिंग मशिन, मिक्सर सारखी यांत्रिक उपकरणे वापरात आहेत.

अशा प्रकारे सुखाची साधने आणि सोयी सुविधा उदंड झाल्या. मनोरंजनाचे व आनंदाचे असंख्य प्रकार, मार्ग सर्वांना सर्रास उपलब्ध आहेत. शे-दिडशे वर्षापूर्वीचे जीवन अतिशय कष्टदायक होते. माणसे नाना हालअपेष्टा सोसून जगत. आजचा माणूस त्या मानाने भरपूर सोयी उपभोगतो.

वरील पार्श्वभूमीवर काही मूलभूत प्रश्न मनाला तीव्रतेने डसतात. त्यातला मुख्य प्रश्न हा की, भौतिक सुखाची, समृद्धीची एवढी लयलूट असूनही आजचा सामान्यमाणूस अंतर्यामी खरोखरीच सुखी समाधानी आहे का ? 'माणूस सुखी नाहीए !' हे त्या प्रश्नाचे उत्तर आहे.

माणसे भयग्रस्त, चिंतातुर आणि ताणतणावांनी अंतर्बाह्य ग्रासलेलीच अधिक आढळतात. राष्ट्राराष्ट्रातही परस्परांविषयी एकप्रकारचा संशय, सूड, द्वेष, रोगट स्पर्धा, हिंसा... ह्याच भावना जाणवतात.

ज्या 'सुखा' साठी अहोरात्र आटापिटा करायचा ते सुख गवसले का ? ती निरामय मनःशांती लाभली का ? माणसे मनाने तृप्त, संतुष्ट आहेत असे निःशंकपणाने म्हणता येते का ? तसे म्हणता येण्याजोगी सद्यःस्थिती नाही. मग असे का ?

माणसे दिवसेंदिवस आत्मकेन्द्रित, आत्मलुब्ध बनत आहेत. 'मी, माझी बायको, मुले, माझे घर नि केवळ माझी सुखदुःखे' -एवढ्याच वर्तुळात निमग्न राहण्यात धन्यता मानण्याची स्वयंसंतुष्ट वृत्ती बळावत आहे. टी.व्ही. सारखे फायदे जरुर आहेत; पण तोटेच जास्त. टी.व्ही. च्या अतिरिक्त नादापायी माणसे जास्त तुटक, कोरडी आणि माणूसघाणी झालीयत हा तोटा मोठा ! परस्परसंपर्क, सहवास, सुखसंवाद आणि सामरस्य ही प्रक्रियाच गोठत चालली आहे. वाचनसंस्कृतीची जागा दर्शनसंस्कृतीने घेतल्यामुळे, आणि त्यात पुन्हा संगणकाची नवी भर पडल्यामुळे 'लेखन-वाचन-विचार' हा प्रकार लुप्त होईल की काय अशी भीती वाटते !

सध्याच्या दुर्दशेला अनेक घटक वा अनेक कारणे असू शकतील, आहेतही. एकाबाजूने जगाने भौतिक विकासाचे, सुखसमृद्धीचे आणि शास्त्रीय प्रगतीचे उत्तुंग शिखर काबीज केले यात काहीच शंका, वाद नाही. दुसऱ्या बाजूने आपला नैतिक अधःपात झाला आहे हे या दुर्दशेचे एक महत्त्वाचे कारण आहे असे वाटते. गुणात्मक किंवा मूल्यात्मक दृष्टीने पाहू गेल्यास असे दिसते की, आजचे जग झपाट्याचे विनाशाच्या दिशेने चालले आहे.

भौतिक समृद्धी आणि नैतिक विकास या दोन्हींचा सुयोग्य समन्वय साधता आला तरच एकविसाव्या शतकातील मानवजात खऱ्या अर्थाने सुखी होईल !

पण हे कुणी कुणाला सांगायचे ?

**श्री. श्रीराम कृ. बोरकर**
२ कामधेनू, घंटाळी, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : ५३६६२०१

• • •

मूल बापासारखे आहे की नाही ते आईलाच विचारा.

# सरत्या सहस्त्रकातील सर्वात महान व्यक्ती

श्री. रविंद्र वि. मांजरेकर

*(गेल्या शतकातील महान व्यक्ती कोण ? प्रत्येकाचे उत्तर वेगळे असू शकते. या प्रश्नाच्या अनुषंगाने व्यक्त झालेले विचार या लेखात आहेत. - संपादक)*

मानवाच्या गेल्या १००० वर्षाच्या इतिहासातील सर्वांत महान व्यक्ती शोधून काढणे, हे वास्तविक जोखमीचे काम आहे. जोखमीचे अशाकरता कारण जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये माणसाने स्वतःच्या बुद्धिमत्तेचा आणि कल्पकतेचा ठसा उमटवलेला आहे. त्या प्रत्येक क्षेत्राची स्वतःची अशी महत्वाची व्यक्तीमत्वे आहेत. त्याच बरोबर आपण या सहस्त्रकाच्या शेवटच्या शतकात आहोत, त्यामुळे या आधीच्या नऊ शतकांमधील व्यक्तींचा आपल्याला तितकासा परिचयही नाही. त्यामुळे कदाचित त्या ज्ञात अज्ञात व्यक्तींवर अन्याय होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या दृष्टीने हे काम जोखमीचे आहे.

कोणतेही कार्य सिद्धीस जायचे असेल तर त्यास अनेक जण आपआपल्यापरीने सहकार्य करीत असतात, परंतू या सहकार्याचा योग्य तो वापर करणारा व सगळ्यांना नियंत्रणात ठेवणारा कोणीतरी एक असतोच. सर्वसामान्यतः त्या कार्यांत 'तीच' व्यक्ती सर्वश्रेष्ठ ठरते.

मानवी इतिहासाच्या बाबतीत हे सूत्र खरे ठरते. आणि म्हणून ह्या सूत्राच्या आधारेच सरत्या सहस्त्रकातील सर्वांत महान व्यक्तीची निवड करणे योग्य ठरेल.

मी माझ्या अल्प-स्वल्प बुद्धिमत्तेप्रमाणे या महानते संदर्भात माझे काही निकष ठरवले आहेत. त्यांची एक यादी केली आणि ज्या व्यक्ती सर्वसाधारणपणे मला महान वाटतात त्यांची एक यादी केली व या यादीतल्या प्रत्येक व्यक्तीवर मी माझे निकष पडताळून पाहिले. तेव्हा प्रत्येक व्यक्ती कोणत्या-न-कोणत्या निकषावर मला बाजूला ठेवावी लागली. सरतेशेवटी एक व्यक्तीमत्व मात्र मला माझ्या या सर्व निकषावर तंतोतंत खरे उतरणारे मिळाले आणि माझ्याकरता या सहस्त्रकातील सर्वांत महान व्यक्तीचा दर्जा मी त्याच व्यक्तीमत्वाला दिला.

त्या व्यक्तीचे नाव सांगण्यापूर्वी मी माझे महानतेचे निकष स्पष्ट करतो. एक तर ती व्यक्ती सर्वसामान्य असूनही असामान्य असावी; दुसरे म्हणजे ती व्यक्ती दुरदर्शी असावी. तिसरे म्हणजे त्या व्यक्तीने आदर्शवादाला व्यवहाराची जोड देऊन वास्तवात आणलेले असावे. चौथे म्हणजे त्या व्यक्तीकडे द्रष्टेपण असावे आणि पाचवे म्हणजे ती व्यक्ती आज हयात असली किंवा नसली तरी ती आदरणीय, वंदनीय आणि लोकप्रिय असावी.

माझ्या मनाची कोणतीही द्विधा मनस्थिती न होता, मी या निकषांच्या आधारे छत्रपती शिवाजी महाराज यांचीच निवड केली आहे.

शिवाजी महाराजांचा जन्मच झाला नसता, तर या देशाचे काय झाले असते. या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. परंतु भारताच्या इतिहासाचा पुढील क्रम बघता- भारत स्वत्वाला पूर्ण पारखा झाला असता असे वाटते, 'स्वराज्य' ही काय चीज आहे याची कल्पनाही त्याला नसती. आणि त्याकाळी नुकतीच मूळ धरू लागलेली कंपनीची सत्ता भारतात अधिक लौकर दृढ झाली असती.

शिवरायांनी लोकांमध्ये विश्वासाची भावना निर्माण करून आपल्या स्वराज्य कार्यासाठी त्यांचा उपयोग करून घेतला. 'स्वराज्य' हेच त्यांचे ध्येय होते. या ध्येयाच्या प्राप्तीसाठी त्यांनी धर्म, पंथ, जातिभेद मानले नाहीत.

---

अस्थिर शांततेपेक्षा युद्ध झालेले बरे.

एका ध्येयाने प्रेरित झालेला समाज शिवरायांनी निर्माण केला. त्यांच्या काळात समाजात जाती, पंथ, धर्म, भेद, आर्थिक विषमता नव्हती असे नाही. पण 'राष्ट्रकार्य' हे या सर्वांहून श्रेष्ठ असल्यामुळे त्याच्या आड हे भेद येता कामा नयेत अशी शिकवण त्यांनी लोकांना दिली. लोकांचा विश्वास मिळवणे त्यांची पारख करता येणे आणि निष्ठावंत अनुयायी मिळवणे या तीन गोष्टींशिवाय नेत्याचे ध्येय मग ते कितीही उच्च असले तरी सिद्धीस जात नाही, हे शिवाजींनी जाणले. त्यामुळेच अनेक गुणी, जिवावर उदार झालेली माणसे शिवरायांच्या संग्रही होती. त्याकाळात जे रणझुंजार, राजकारण धुरंधर पुरुष होऊन गेले त्यांच्या जडण घडणीत शिवरायांचा सिंहाचा वाटा होता.

प्रजेचे सुख ते राजाचे सुख, प्रजेचे हित तेच राजाचे हित या प्राचीन विचारसरणीला अनुसरून महाराज वागत असत. जमीनदारांच्या, वतनदारांच्या जाचातून मुक्तता करून राजा आणि प्रजा यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. रयतेच्या अभ्युदयासाठी त्यांनी आपली सारी राज्ययंत्रणा कामी लावली होती. आपल्या प्रजाजनांना प्रशासकापासून, सैनिकापासून उपद्रव होऊ नये म्हणून त्यांनी सक्त ताकीद दिली होती. शिवरायांची नैतिक वागणूक चोख असल्याने लोकांना त्यांच्याविषयी आदर व प्रेम वाटणे स्वाभाविक होते. शिवरायांनी राजकीय सत्ता स्थापन करून मराठी मुलुखात स्थैर्य निर्माण केले. या विश्वासामुळेच, लोकांच्या सहाय्याने निर्माण केलेले हे राज्य प्रसंगी मोडेल पण वाकणार नाही. याची महाराजांना खात्री होती.

महाराज हे कुशल 'प्रशासक' होते. २१व्या शतकाच्या उंबरठ्यावर असणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी शिवरायांच्या प्रशासन कौशल्याचा आदर्श ठेवावा असे प्रशासन महाराजांनी निर्माण केले. तलवारीच्या जोरावर प्रदेश जिंकता आला तरी तो टिकवण्यासाठी 'उत्तम प्रशासनाची' आवश्यकता असते हे ओळखून शिवरायांनी आपले प्रशासन उभारले. राज्यकारभार सुरळित चालावा यासाठी कार्यक्षम प्रशासकांची फळी उभारली. 'अष्टप्रधान मंडळ' ही आजही आदर्शवत असणारी पद्धती शिवाय 'व्यवहारकोश' महाराजांनी रूढ केला. लोकसेवकांच्या जागांसाठी निवड करताना महाराजांनी जात, धर्म, वर्ण विचारात घेतले नाही. २० व्या शतकात नेपोलियनने ज्याप्रमाणे गुणीजनांना त्यांच्या गुणानुक्रमे अधिकाराच्या जागा दिल्या. तसेच धोरण महाराजांनी १७ व्या शतकात स्विकारले होते.

अर्थमूलो हि धर्मः । हे जाणून छत्रपतींनी धर्मप्रेरणेला अर्थप्रेरणेची जोड दिली. म्हणूनच असाध्य ते साध्य करता आले. शिवरायांच्या आश्रयाखाली महाराष्ट्राची जनता समृद्ध होऊन 'महान-राष्ट्र' या नावाला सार्थत्व प्राप्त झाले.

छत्रपतींनी जे आर्थिक धोरण प्रस्थापित केले, त्याचे मराठ्यांच्या पराक्रमाच्या दृष्टीने व हिंदवी स्वराज्याच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे. यात शंका नाही. वतनदार वर्गाची जुलमी सत्ता त्यांनी नष्ट केली आणि देशकांचे पुनरूज्जीवन करून सर्व अर्थव्यवहार जनताभिमुख केला. शेतकरी, रयत तिचा उत्कर्ष हे सर्व अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट आहे, हे जे तत्व त्यांनी मराठ्यांना शिकवले ती खरी 'आर्थिक क्रांती' होय.

लोकांनी स्वतःचा कारभार स्वतःच करावा या तत्वावर आधारित गोतसभा, देशकसभा ह्या दोन्ही संस्था म्हणजे लोकसत्तेचा पायाच आहेत.

समुद्रगमन, परदेशगमन हे धर्मशास्त्राने हिंदूना वर्ज्य केले आणि समाजाने हा दंडक मानला होता. शिवरायांनी हा दंडक मानला असता तर त्यांना मराठा आरमार निर्माण करताच आले नसते. पण 'समाजाचा उत्कर्ष ज्याने होईल तो धर्म' असा महाराजांचा दृढ निश्चय असल्यामुळे त्यांनी शास्त्राचा हा आत्मघातकी निर्बंध मोडून काढला आणि परकीय आक्रमणाचा धोका ओळखून कोकणात जलदुर्ग बांधून आरमाराची स्थापना केली. शिवाय समुद्रगमनाचा

काव्य म्हणजे जीवनावरचे सुंदर भाष्य.

पायंडा ही घालून दिला.

छत्रपतींच्या मनाला धार्मिक असहिष्णुता कधीच शिवली नाही. या भूमीच्या, महाराष्ट्राच्या सेवेला जे कोणी सिद्ध होते त्या सर्वांना जाती धर्म निरपेक्ष दृष्टीने त्यांनी आपल्या कारभारात सामावून घेतले. यावरून त्यांनी कोणती 'राजकीय क्रांती' केली हे सिद्ध होईल.

'आपण सारेजण म्हणजे एक राष्ट्र आहोत' ही भावना त्यांनी या लोकांमध्ये रूजवली व त्यांना जागृत आणि संघटित करून, पाचशे वर्ष भारताच्या मानेभोवती बसलेला मुस्लिम सत्तेचा फास तोडून टाकण्याइतके दुर्जेय सामर्थ्य या भूमीला त्यांनी प्राप्त करून दिले. सिंकदर, हॅनिबाल, सीझर यांच्याशी पाश्चात्य लोक त्यांची तुलना करतात. पण ती केवळ एकदेशीय आहे. युद्धनेतृत्वात फार तर ते महाराजांच्या तुलनेला येतील. पण, आपल्या भूमीला त्यांनी सामर्थ्य प्राप्त करून दिल्याचे इतिहास सांगत नाही. 'तयांचे गुण महत्वासी तुलना कैची ?' हेच खरे.

शस्त्रेण रक्षिते राज्ये, शास्त्रचिंता प्रवर्तते । हे व्यासवचन आहे. याचा अर्थ शस्त्रबलाने राज्याचे, समाजाचे रक्षण होत असेल, तरच त्या समाजात शास्त्र, विद्या, धर्म यांचा जन्म होतो, अन्यथा विकसित झालेली शास्त्रे आणि प्रौढ झालेला धर्म यांचाही लय होतो. शिवछत्रपतींच्या आधीच्या ३०० वर्षांच्या काळात नेमके हेच घडत होते. संतानी आपल्या वाणीने धर्मरक्षणाची पराकाष्ठा चालवली होती, पण मराठा सरदार, मुत्सद्यांनी त्यांना युद्धविद्येची साथ दिली नाही. शिवाजी महाराजांनी हे जाणले आणि युद्धविद्येची जोपासना करून महाराष्ट्र संस्कृतीचे रक्षण केले.

महाराजांनी आपली लष्करी संघटना फार उत्तम ठेवली होती. पायदळ, घोडदळ तसेच नौदल या लष्करी विभागावर लहान-मोठे अधिकारी नेमले होते. सैन्याचा पगार रोख आणि व्यवस्थितपणे दिला जाई.

'अखंड सावधान' हे महाराजांच्या लष्करी शिस्तीचे प्रमुख धोरण होते. ते स्वतः अत्यंत जागरूक, अत्यंत सावध असत. महाराष्ट्रातच काय पण दिल्लीपर्यंत कोठे काय चालले आहे याची खडानखडा वार्ता नित्य आणण्याची व्यवस्था त्यांनी केली होती.

महाराजांच्या युद्धविद्येचे 'ध्येयवाद' हे पहिले लक्षण, तर अत्यंत कडक, चोख शिस्त हे दुसरे लक्षण होते. स्वतः छत्रपती म्हणजे मूर्तिमंत ध्येयवाद होते, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे. हिंदुधर्माचे रक्षण, हिंदू संस्कृतीचे पुनरूज्जीवन हे त्यांचे ध्येय तेराव्या-चौदाव्या वर्षीच निश्चित झाले होते. हाच जाज्वल्य ध्येयवाद, सामान्य जनांच्या चित्तात रूजवून त्यांनी 'मारता मारता मरावे, मारून आपण उरावे' यासाठी सिद्ध केले.

'गनिमी कावा' हे तर शिवरायांच्या युद्धविद्येचे वैशिष्ट्य होते. महाराजांच्या दक्षिण दिग्विजयाने तर महाराजांची राजकीय डाव खेळण्याची धाडसी व धडाडीची प्रवृत्तीही विशेषत्वाने जाणवते. या राजकीय कारवाईची उत्कृष्ट व असामान्य म्हणून इंग्रजांनीही नोंद घेतली होती.

छत्रपती हे काही ग्रंथकार-तत्ववेत्ते म्हणून प्रसिद्ध नाहीत. त्यांनी एकही ग्रंथ लिहिला नाही. पण त्यांनी प्रत्यक्ष जे कार्य केले त्यावरून त्यांचा पत्रव्यवहार, त्याकाळातील बखरी आणि समर्थांनी केलेला गौरव इत्यादी साधनांवरून अस निश्चित म्हणता येते की क्रांतीच्या तत्वज्ञानाच्या दृष्टीने पहाता हा महापुरुष तत्त्ववेत्यांचाही 'तत्ववेत्ता' आहे. क्रांतीचे तत्त्वज्ञान, तिचे काही सिद्धान्त प्रारंभीच निश्चित केल्याबाचून त्यांनी केलेले कार्य त्यांना करताच आले नसते.

त्याकाळात, प. युरोपाच्या तुलनेत भारतीय समाजाचे प्रबोधन झाले नाही. छत्रपतींनी जे कार्य केले त्यामागे प्रबोधनाची काही तत्त्वे होती. पण त्या तत्वांचा समाजात प्रसार करण्याचे जे काम शास्त्र-पंडितांनी करायला हवे ते झाले नाही. एकटा नेता, तो महापुरुष असला तरी शिवछत्रपतींनी जे कार्य केले त्यापेक्षा जास्त काही करू

---

आपले कोणी कौतुक केले तरच आपल्याला त्याचे कौतुक वाटते.

शकत नाही. अर्थात त्यांनी जे केले त्यांच्या एकशतांश सुद्धा त्यावेळच्या युरोपातल्या राजांना करता आले नाही. हे लक्षात घेण्यासारखे आहे.

तुमचा धर्म हा धर्मच नव्हे, अशा मिजाशीत वावरणाऱ्या वृत्तीपुढे सतत शरण येणाऱ्या राष्ट्राने काय केले पाहिजे ते दाखवून देणारे छत्रपती शिवाजी महाराज हे आदर्श राष्ट्रपुरुष होते. जे हिंदु या कलियुगात हिंदुराजा होणे नाही, आता मुसलमानच आपल्यावर राज्य करणार असे मानण्याइतके मरगळले होते. त्यांच्यामनापुढे इराण, अफगाण येथपर्यंत स्वराज्य स्थापना करण्याची स्वप्ने शिवाजी महाराज सिंहासनाधीश्वर झाल्यावर तरळू लागली. छत्रपतींचे अवतार कार्य ते हेच !

शिवछत्रपतींनी महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या इतिहासाला ही नवे वळण लावले. त्या इतिहासातही नवे युग निर्माण केले. त्यांच्या नंतरच्या राज्यकर्त्यांच्या ठायी त्यांच्या सारखी प्रज्ञा नव्हती. तसे कर्तृत्व नव्हते. पण मराठा समाजात एक नवे चैतन्य निर्माण झाले होते यात शंका नाही. केवळ त्याच बळावर महाराजांच्या निर्वाणानंतर महाराष्ट्र देशावर आलेल्या फार मोठ्या परकीय संकटाचा मराठ्यांनी सामना केला. आपल्या सर्वसामर्थ्यानिशी दक्षिणेत उतरलेल्या औरंगजेबाचं भारताच्या इस्लामीकरणाचं स्वप्न धुळीस मिळाले. आणि मोगली सत्तेचा कणाच मोडून काढला गेला. महाराजांनी लोकांमध्ये निर्माण केलेली आणि स्वतःच्या वर्तनाने सतत जागृत ठेवलेली 'स्वराज्य निष्ठा' हे यामागचे कारण ठरले.

महाराजांचे कर्तृत्व आणि नियती यांचा संघर्ष त्यांच्या बालपणापासूनचा होता. त्यात कधी महाराज तर कधी नियती विजयी होत होती, स्वराज्य स्थापनेसाठी विभिन्न थरातल्या लोकांना एकत्र आणणाऱ्या शिवरायांना गृहकलहाच्या रूपाने नियतीने लेखण्याचा प्रयत्न केला. शिवरायांनी आदर्श योद्धे घडवले, गुणी माणसांचा संग्रह केला, पण स्वतःच्या मुलाचा ऱ्हास पहाण्याची वेळ ही त्यांच्यावर आली. स्वकर्तृत्वाने शिवरायांनी स्वराज्य निर्मितीचे गाडे ओढले. आणि जेव्हा या स्वराज्याला त्यांची नितांत गरज होती. तेव्हाच नेमका नियतीने सूड उगवला.

आपल्या देशाच्या आणि प्रजेच्या गरजा जाणणारा हा 'द्रष्टा' राजा होता. म्हणूनच समर्थांनी 'यशवंत', 'दानवंत', 'जाणता राजा' अशा वेचक विशेषणांनी महाराजांना गौरविले आहे. महाराजांच्या या जाणतेपणातूनच लोकनेतृत्व निर्माण झाले. या त्यांच्या लोकनेतृत्वातूनच त्यांना राजपद प्राप्त झाले. म्हणूनच जदुनाथ सरकार म्हणतात त्याप्रमाणे साम्राज्याचे विघटन होते, राजघराणी नष्ट होतात, पण लोकनेत्या शिवाजीसारख्या एखाद्या राजाची आठवण मात्र मानव जातीला चिरंतन प्रेरणा देत राहते.

शिवाजी महाराज प्रथम लोकांचे नायक होते, आणि लोकांच्या प्रेमामुळे आणि सहकार्याने ते त्यांचे राजे बनले.

एखाद्या मूर्तिकाराची एखादी मूर्ती अतिशय सुंदर बनते, ती जमून जाते. पुन्हा तशीच मूर्ती घडवणे त्याला शक्य होत नाही. शिवरायांच्या बाबतीत परमेश्वरांचेही तसेच झाले आहे, त्याने अनेक कर्तृत्वान व्यक्तीमत्वे नंतर जन्माला घातली, पण त्याला देखील दुसरा शिवाजी नाही घडवता आला. शिवरायांचे हे एकमेवाद्वितीयत्व, आज ३५० वर्षानंतरही या देशात त्यांचे नाव घेताच आपण आदराने नतमस्तक होतो, ही लोकप्रियता आणि त्याचबरोबर महाराजांच्या कर्तृत्वाची आपल्या मनावर स्वाभाविकपणे पण ठसठशीत उमटलेली राजमुद्रा हे त्यांचे वेगळेपण या तीन गोष्टीदेखील महाराजांचे या सहस्रकातले सर्वश्रेष्ठत्व सिद्ध करण्यास पुरेशा आहेत, असे माझे प्रामाणिक मत आहे.

**श्री. रविंद्र वि. मांजरेकर**
द्वारा : श्री. मकरंद नेवाळकर,
२०१, स्मृती, बाजी प्रभु देशपांडे मार्ग, विष्णूनगर, ठाणे.

• • •

कला म्हणजे अनुभवारच उमटवलेला आकृतिबंध आहे. काव्य म्हणजे जीवनावरचे सुंदर भाष्य.

# कोचिंग क्लासेस - एक आत्मपरीक्षण

मंजुषा दांडेकर

*(क्लासेस ही आजची गरज आहे येथ पासून ते क्लासेसची आवश्यकताच नाही इथ पर्यंतची उलट सुलट मते आपण ऐकतो. या दृष्टीने हे आत्मपरीक्षण महत्त्वाचे ठरावे. - संपादक)*

कोचिंग क्लासेस-वादाच्या भोवऱ्यात सापडलेला विषय. कोचिंग क्लासेस आवश्यक की अनावश्यक ? क्लासमधे कोणी शिकवावे अगर शिकवू नये ? असे एक ना अनेक प्रश्न आज वादातीत आहेत. नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे याही प्रश्नाला दोन बाजू आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात Class Education होते. वर्गात विद्यार्थ्यांची संख्या प्रमाणात असे. त्यामुळे शिकविणारे शिक्षक व शिकणारा विद्यार्थी यांच्यात सुसंवाद असे. विद्यार्थ्यांची पूर्ण माहिती शिक्षकास असे. आज याच्या उलट परिस्थिती दिसते. लोकसंख्या वाढीमुळे व Mass Education मुळे वर्गातील मुलांची संख्या वाढली. त्यामुळे शिक्षकाला प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे जमत नाही. शिवाय शिक्षकाला शिकविण्यासाठी मिळणाऱ्या वेळेवर मर्यादा आहेत. त्या मर्यादेत त्याला पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम व शिवाय इतर कामे एवढे करायचे असते त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय मिळत नाही व ते कोचिंग क्लासकडे वळतात. दुसरे असे की काही वेळेला शिक्षकांची निवड चुकीची होते म्हणजे त्याचा जो विषय आहे तो त्याला न देता भलताच विषय दिला जातो त्यामुळेही विद्यार्थी क्लासकडे वळतात. तिसरे म्हणजे आजची शिक्षणपद्धती. १९७३ पूर्वी शालांत परीक्षेसाठी इंग्रजी व गणित हे एच्छिक विषय होते त्यामुळे ते विषय न घेताही विद्यार्थी परीक्षेला बसत असत, उत्तीर्ण होत व पुढचे शिक्षण अर्थात् आपल्या पसंतीचे घेत असत. पण १९७३ नंतर इंग्रजीबद्दलचे प्रेम उफाळून आले आणि इंग्रजी व गणित विषय सक्तीचा केला गेला त्यामुळे गळतीचे प्रमाण वाढले, नापासांची संख्या वाढली. हे कमी व्हावे, स्पर्धात्मक युगात टिकून रहावे यासाठी पूरक अभ्यास म्हणून काही विद्यार्थी क्लासवर अवलंबून राहू लागले.

शहरात जसा जास्त पैसा घेणारा डॉक्टर चांगला तसे हल्ली क्लासेसचे झाले आहे. जास्त पैसा घेऊन मार्गदर्शन करणारा क्लास चांगला मग तो कुठल्या दर्जाचे शिक्षण देतो ही गोष्ट पालकही पाहात नाहीत व विद्यार्थीही पाहात नाहीत. खरे तर क्लासला कोणी जावे ? ज्याला शाळेत शिकवलेले समजत नाही, घरी मार्गदर्शन करण्यासारखे सुशिक्षित पालक नाहीत. आजूबाजूचे वातावरण चांगले नाही अशांसाठी खरे तर क्लासची आवश्यकता म्हणजेच ते क्लास न राहता अभ्यासिका असे तिचे स्वरुप राहील. पण येथेही स्पर्धा. क्लास किती मोठा, तेथील सुखसोयी किती यावर सारे अवलंबून. काय गंमत आहे पहा, शाळेतील वर्गात विद्यार्थ्यांची संख्या जास्त म्हणून पालक विद्यार्थ्यांना क्लासला पाठवतात पण काही वेळा तेथेही तीच परिस्थिती याचा विचार करीत नाहीत.

आज १०वी १२वी च्या गुणांना अवास्तव महत्त्व दिले जात आहे त्यामुळे तिथे धोका पत्करण्याची पालकांची वा विद्यार्थ्यांची तयारी नसते. शिवाय प्रत्येक पालक माझ्या पाल्याने इंजिनिअर किंवा डॉक्टर व्हावे ही महत्त्वाकांक्षा घेऊन बसलेला त्यामुळे स्पर्धेत आणखीनच भर. १२वी च्या वर्गासाठी ११वी ची पहिली टर्म संपली की लगेच प्रवेश सुरू म्हणजे ११वी च्या परीक्षेत आपण हमखास पास होणार अशी खात्री असते. त्यातूनही एखाद्याचे नशिब जर तो

विद्यार्थी नापास झाला तर फी चे पैसे परत मिळत नाहीत असे गल्लाभरू क्लासेसही चालतात. १०वी, १२वी सोडा अगदी K.G. ते P.G. पर्यंत क्लास लावणारे विद्यार्थीही आहेत. स्वतः अभ्यास करावा, मेहनत करावी असे विद्यार्थ्यांना किंवा त्यांच्या पालकांना का वाटत नाही ?

आजची आपली शिक्षणपद्धती ही कोचिंग क्लासेसमधे विद्यार्थ्यांना जायला भाग पाडते. व्यावहारीक ज्ञान न देणारी आजची शिक्षणपद्धती. माहितीचा अनावश्यक कचरा डोक्यात भरण्याची किमया म्हणजे आजचे शिक्षण. घोका आणि ओका यामुळे ज्यांची स्मरणशक्ती चांगली ते विद्यार्थी पास होतात बाकीचे कसेबसे लळत लोंबत चालत राहतात. ज्ञानार्थी तयार करणारे आजचे शिक्षणच नाही. The fruit of education is not learning but to develop desires and capacities हे वाक्य शिक्षणाची कल्पनाच स्पष्ट करते पण आजचे शिक्षण म्हणजे Spoon feeding सारखे वाटते. मुलांच्या दृष्टीने बोजड, नीरस अभ्यासक्रम त्यांच्या माथी मारला तर गाईडमधून उत्तरे घोकायची आणि परीक्षेत लिहायची एवढा एकच पर्याय त्यांच्यापुढे उरतो. आजच्या शिक्षणपद्धतीचे एडगर फ्रोडनवर्ग यांनी चांगले वर्णन केले आहे ते म्हणतात Todays education punishes creativity and independance खरच आहे. आज विद्यार्थ्यांनी स्वतःच्या मनाने लिहिलेल्या उत्तरापेक्षा गाईडमधल्या उत्तरालाच पुरेपूर गुण मिळतात.

शिक्षण हे परीक्षेसाठी आहे. केवळ पदव्यांची लांबलचक शेपूट मिळवायची व त्या आधारे जीवन जगायचे हा आजच्या शिक्षणाचा हेतू दिसतो.

२१व्या शतकाकडे जाताना ज्ञानाचा प्रचंड विस्फोट होऊनही आजची पिढी अद्ययावत ज्ञानापासून वंचित ठेवण्याची धोरणे आखली जात आहेत. चिंतामणराव देशमुखांनी स्टेशनमास्तर व शाळा मास्तर यातला फरक One minds the train and another trains the mind असा सांगितला होता. हेच पुढे धरून असे म्हणता येईल की समाजात हाडाच्या शिक्षकाला भरपूर वेळ, अधिकार आणि मुबलक साधन, पैसा हे सार मिळाल तर तो इतर ठिकाणी जाईलच कशाला ? शालेय शिक्षक किंवा प्राध्यापक यांना म्हणावा तसा समाजात मान नाही. शालांत परीक्षा पास होऊन गुणवत्ता यादीत येणारा एकही विद्यार्थी मी शिक्षक होईन किंवा प्राध्यापक होईन म्हणत नाही. यावरून काय ते समजा. आज आपण पाश्चात्यांकडे पाहतो तेथील शिक्षणपद्धती पाहतो पण जपानमधे प्राथमिक शाळेच्या शिक्षकाला इंजिनिअरच्या तोडीचा पगार मिळतो व त्या बदल्यात तेवढेच अध्यापनाच काम तो करतो हे कोण जाणणार ? पुरेशा पगाराअभावी मग हे शिक्षक कोचिंग क्लास सुरू करतात त्यात त्यांचा काय दोष ?

यावर उपाय एकच तो म्हणजे जीवघेणी स्पर्धा ठरणारी परीक्षा पद्धती बदलणे.

मंजुषा दांडेकर
ठाणे.

• • •

With Best Compliments From

A
Well
Wisher

सुरक्षित अंतर ठेवून शूर होणे सोपे असते.

# संगणक पदव्युत्तर अभ्यासक्रमातील एक घटक : आकलन आणि परावर्तन

श्री. रावसाहेब बोरसे

*(संगणकाच्या शिक्षणाचे स्वरूप काय असावे, आज दिल्या जात असलेल्या संगणक शिक्षणातून (विशेषतः पदव्युत्तरस्तरावरील) आपण काय साधत आहोत असे अनेक मूलभूत प्रश्न शिक्षण तज्ज्ञांसमोर आज आहेत. सदर लेखात गेल्या ७-८ वर्षातील निरीक्षणांवर आधारित काही मुद्दे आले आहेत. सदर लेख मूळ इंग्रजी लेखाचे स्वैर भाषांतर आहे. - संपादक)*

विद्यापीठातील पदव्युत्तर शिक्षणात दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात संगणकाचे कार्य काय असावे ? हा वादाचा प्रश्न आहे. UGC च्या माहितीच्या आधारे सन १९९३ मध्ये आधीच ठरविल्याप्रमाणे गणित, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, भूगोलशास्त्र, अर्थशास्त्र, ग्रंथालय, विज्ञान व वाणिज्य या प्रमाणे संगणक हा विषय विद्यापीठाने ठरवावा. उदा. पदव्युतर अभ्यासक्रमातील गणित अभ्यासक्रमात FORTRAN भाषेत संगणक Programming, Lotus 1-2-3 आणि MS-EXCEL याप्रमाणे इलेक्ट्रॉनिकचा विस्तारित अभ्यासक्रम व संख्यांचे पृथ्थकरण व मोजणीचे तंत्र हे विषय येतात. स्वतंत्र पेपर म्हणून ह्या अभ्यासक्रमाला मोजकेच विद्यार्थी घेण्यात यावे. संगणकातील विषय घेण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांला बळजबरी न केलेली बरी. संगणक विज्ञानातील प्रगती संबंधित तंत्रज्ञानाला अनुसरुन सन १९९३ मध्ये हा विषय प्रस्थापित करण्यात आला.

विज्ञानातील प्रगतीमुळे आधुनिक युगात PC म्हणजे व्यक्तीगत संगणक तत्परतेने उपलब्ध असतात. नवीन सहस्त्रकाच्या आगमनाने इंटरनेटवर आधारित तसेच संगणकाचे सुटे भाग आणि इतर माहिती थोड्याच किमतीत आता तयार असतात. उदा. Intel Pentium 100/133/166 MHz मशीन, 32 MB RAM सह, 1.2 GB HDD विविध माध्यमातील सामग्री, SVGA प्रमुख उपकरण (Monitor) टंकयंत्र आणि Mouse 20,000 ते 25,000 रुपयांपर्यंत उपलब्ध असतात. Intel 80486 वर आधारित उपकरण (33/66 MHz) 16 MB RAM सह 540 MB / 1.2 GB HFF, उपयुक्त किंवा विविध माध्यमातील सामग्री, SVGA प्रमुख उपकरण संगणकाच्या इतर भागांसह १० ते १५ हजार रुपयांपर्यंत आणि Intel 80386/80286 कमी किमतीसह ६ ते ९ हजार रुपयांपर्यंत मिळू शकते. संगणकाच्या भागांच्या किंमती कमी झाल्या आणि त्याचवेळी संगणकांची संख्या वाढली. चांगल्या प्रकारच्या दर्शनीय पडद्यांची निर्मिती झाली. (32-128 MB) आणि (2.1-10 GB) या दोन्ही प्रकारच्या मेमरींची विपुलता झाली. तसचे TCP /IP आणि VSNL वरील इंटरनेटच्या प्रणालीवर संगणकाच्या मोठ्या माहितीची पॅकेजेस निघाली. आता महाविद्यालाचा आणि विद्यापीठाचा निकाल सुद्धा संगणकाद्वारे घोषित केला जातो. तरी पण संगणकाचा वापर हवा तसा होत नाही. PC फार उपयुक्त आहेत असे दिसत असतांना विद्यापीठाच्या व्यवस्थापनात त्याचे महत्त्व कमी करण्यात येत आहे.

पदव्युतर अभ्यासक्रमानंतर १० ते १५ टक्के विद्यार्थी वेगवेगळ्या उद्योगात कामाला लागतात. आणि औद्योगिक व्यवस्थापनात काम करतात. काही बँकामध्ये तर काही

सहकारी कार्यालयात कामे करतांना दिसतात. काही मोठमोठ्या व्यवस्थापनात तर काही शिक्षकी पेशात काम करतांना दिसतात. उरलेली ५ ते १० टक्के विद्यार्थी फक्त नवीन संशोधनासाठी आपल्याला वाहून घेतात. अशा प्रकारचा जर का विद्यार्थ्यांचा मनोदय असेल तर विद्यापीठाला या बाबतीत विचार करायला हवा तसेच विद्यार्थ्यांच्या नोकरीच्या बाबतीत विद्यापीठाला सावध रहायला हवे. ज्या विद्यार्थ्यांनी संगणकाचे शिक्षण घेतलेले आहे. त्यांना संगणकाच्या इतर माहिती विषयी ज्ञान असायला हवे यात शंकाच नाही. तसेच वेगवेगळ्या संस्थांमध्ये PC कसे उपयुक्त आहेत, त्यांच्या माहिती विषयी ज्ञान असायला हवे.

PC मध्ये Word Processing मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. अहवाल, इतर पत्रव्यवहार, पत्रांची आठवण, पत्रात फेरफार करणे, पत्र निर्मिती करणे यासाठी PC हा उपयुक्त योजक आहे. PC चा प्रिंटर हा टाईपरायटर पेक्षा महाग आहे हे जरी खरे असले तरी त्याची कार्य क्षमता, अचुकता त्याच्या किमतीच्या मानाने फार आहे. संगणकांच्या साधनांचा विक्री अहवाल, दररोजचे पैशांचे व्यवहार, तसेच अनेक बाबींची समरी काढणे. यात उपयोग करता येतो. संगणकाचा उपयोग dBase Management System मध्ये करता येतो. dBase पॅकेजच्या साह्याने मोठमोठ्या विभागातील माहिती साठविता येते, शोधून काढता येते. E- mail च्या सहाय्याने पत्रव्यवहार करता येतो. e-commerce मध्ये भाग घेता येतो. ERP-SAP वर आधारित उपयोग घेता येतो. इंटरनेट, इलेक्ट्रॉनिकची शिबिरे तसेच प्रत्यक्षात असलेल्या लांबच्या शिक्षणाचा उपयोग घेता येतो.

परंतु PC संगणक चांगल्या परिस्थितीत वापरण्यासाठी माणसाला किती ज्ञानाची गरज आहे आणि किती पदव्युत्तर विद्यार्थी नोकरीसाठी प्रयत्न करतील? PC वर लहानशी प्रॅक्टीस करुन काही लोक प्राथमिक चाचणीच्या साह्याने जास्तीत जास्त कौशल्य संपादन करु शकतात. आपल्या जीवनातील समस्यांना तोंड देण्यासाठी विद्यार्थ्यांनी संगणकाचे भाग, त्याच्या माहितीची दालने Word Processing, d Base, नेटवर्क आणि इंटरनेटची थोडीशी जुजबी माहिती करुन घ्यायला हवी.

ह्या संगणकाच्या प्राथमिक अभ्यासक्रमात जास्त तंत्रज्ञानाची आवश्यकता नाही. विद्यार्थ्यांनी संगणक आणि त्याची कार्यप्रणाली याची माहिती करुन घेणे हा मुळ उद्देश आहे. १) संगणकाचे मूळ महत्त्व २) संगणकाचे भाग आणि इतर माहिती ३) पत्रव्यवहारासाठी MS-Word, Lotus 1-2-3, मोठमोठ्या आराखड्यांसाठी MS-EXCEL, d Base III Plus /Ac.CESS/FOX Pro, dBase व्यवस्थापनासाठी Oracle आणि RDBMS ४) संगणकातील कार्यप्रणालीची सर्व साधारण कल्पना या गोष्टी प्राथमिक अभ्यासक्रमात उपलब्ध असाव्यात. ग्रंथालय व्यवस्थापनातील पध्दत, विद्यापीठातील व्यवस्थापनातील पध्दत पैशांचे व्यवहार आणि कंपनीच्या व्यवस्थापनातील पध्दत यांना dBase कार्यप्रणालीच्या साह्याने तसेच संगणकाच्या माहिती साधनाच्या साह्याने विद्यार्थ्यांना संगणकावर प्रबंध करायला लावणे. तसेच पदव्यत्तर विद्यार्थ्यांसाठी सखोल आणि संगणकाच्या मुलभूत अभ्यासक्रमाचे महत्त्व कळवून दिले पाहिजे.

संगणकाच्या मोठ्या वाढत्या तंत्रज्ञानाबरोबर संगणकाच्या लहान लहान कामासाठी उपयोगी पडणारे यंत्र तसेच इतर साधने उपलब्ध असतात. परंतु आपल्या संस्थेत या साधनांचा उपयोग करणारे लोक कमी आहेत. समजा बँकेच्या कामाची कार्यप्रणाली एखाद्या व्यक्तीला दिली गेलेली आहे, त्या व्यक्तीला पैशांचा आणि बँकेच्या व्यवहारासाठी माहिती दिली गेलेली आहे. संगणकाच्या माहिती विषयी ज्ञान असलेली, मोठमोठे आराखडे आणि dBase चे ज्ञान असलेली व्यक्ती जर का वाणिज्य शाखेच्या पदव्युत्तर विद्यार्थी असेल तर ती व्यक्ती संगणकाचा चांगला

उपयोग करु शकते.

ह्या अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षाला या ठराविक अभ्यासक्रमाच्या कक्षा विस्तारायला हरकत नाही. Data आणि File संरचना, Unix Operating System आणि Programming संगणक C जावा पद्धतीचे शास्त्र, C++ किंवा Visual C++ Programming चे उपयोग, संख्याशास्त्राचे विश्लेषण आणि गणिता संबंधीचे गणनशास्त्राचे तंत्र हे नवीन अभ्यासक्रम होत. वस्तूनिष्ठ प्रश्न हे विद्यार्थ्यांना चालना देणारे, त्यांच्या ज्ञानात भर घालणारे, आणि नोकरी संबंधात त्यांचे तिक्ष्ण कौशल्य दाखविणारे असतात. भविष्यात वाढणाऱ्या कारखानदारीत, निरनिराळ्या संस्थांमध्ये, व्यापार उद्योगात आणि शिक्षण क्षेत्रात अशा ज्ञान संपादन केलेल्या लोकांची खरी मागणी असते. जावा कार्यप्रणाली आणि e-commerce सारखे नेटवर्क तंत्रज्ञान COBAL मध्ये कार्यक्रम संगणकातील माहिती ज्ञानातील विकास हे ह्या अभ्यासक्रमातील हवे असलेले विषय आहेत. नेटवर्क तंत्रज्ञान आणि COBAL Programming हे कार्यक्रम अर्धवेळ अभ्यासक्रम म्हणून चालविले पाहिजे.

ह्या दोन मुलभूत अभ्यासक्रमांबरोबरच पदव्युत्तर विभागाने संगणकाच्या प्रगतीचा अभ्यासक्रम पुढील शिकाऊ विद्यार्थ्यांसाठी विशेष परिक्षा संगणक विज्ञान आणि तंत्रज्ञानात ठेवायला हवी. अभ्यासक्रमातील साच्याप्रमाणे वेगवेगळ्या विभागासाठी हा अभ्यासक्रम वेगवेगळा ठेवायला हवा. उदा. गणिताच्या अभ्यासक्रमात विविध घडामोडी आणि बदल करतात / Algorithons चे पृथ्थकरण आणि नवीन घडण/कृत्रिम बुद्धी/पुसटसे गणित आणि त्याच्या विकसन पद्धती /अधुंकशी पद्धती आणि मज्जासंस्थेचे जाळे/विभागतेच्या स्पर्धा आणि त्यांचे नेटवर्क अशी जाळीदार कार्यप्रणाली. गणितातील विशेष परीक्षांच्या साह्याने एक चांगला विद्यार्थी देशात किंवा देशाच्या बाहेर सुद्धा चांगला अभ्यास करण्यासाठी जातो किंवा एखाद्या R & D मध्ये नोकरी करतो. अशी खात्री आहे की, पुढील सहस्त्रकातील पुढील पाच वर्षात तंत्रज्ञानात भाग घेतल्याशिवाय रहाणार नाहीत. गणित शिकण्यासाठी संगणकाचा अभ्यास आणि पहाणीनुसार सोपे आहे. यावरून चार महत्वाचे मुद्दे लक्षात येतात. १) शिकलेले तंत्रज्ञान आपल्या कामासाठी सरळपणे वापरु शकतो, २) टोकदार, पृथ्थकरणाची, संशोधकतेची गंभीरता आणली. विस्थापित जगातील तसेच समाजातील समस्या सोडविण्यासाठी मदत केली. ३) या अभ्यासक्रमातील संगणक ज्ञानामुळे विद्यार्थ्याला नव्या सहस्त्रकातील नव्या उपक्रमांची आणि दर्शनाची भर पडेल आणि शेवटी या अभ्यासक्रमानंतर यथायोग्य नोकरीची संधी मिळेल.

वरील सर्व गोष्टींचा अभ्यास करता विद्यापीठाने शैक्षणिक विभागाचे नियोजन करताना संगणक शिक्षणाचे भान लक्षात ठेवायला हवे. कालानुरुप राजकारण आणि नियोजनाची लवचिकता पाळली पाहिजे. तरच संगणक विज्ञानातील आणि माहिती तंत्रज्ञानातील जबाबदारी आणि अचानक कालानुरुप होणारे बदल व्यवस्थित हाताळता येतील.

**श्री. रावसाहेब बोरसे**
वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन ग्रंथालय,
ठाणे.

• • •

# राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीतून माझा देश

श्री. सुहास साठे

*(राष्ट्रीय एकात्मता हा विषय अतिशय महत्वाचा, पण तितकाच उपेक्षित विचार. सदर लेखात हा विचार मांडताना श्री. साठे विविध दृष्टीतून या विषयाकडे पहातात असे आणवते. - संपादक)*

संपूर्ण समाजात एकजिनसीपणा असणं अत्यावश्यक आहे. भारत एक राष्ट्र आहे व या राष्ट्राशी एकरूप होऊन राहण्याची तीव्र इच्छा असणं म्हणजेच राष्ट्रीय एकात्मता! भारतीयता ही कल्पना फार विशाल आहे. भारत हा विविधतेने सजलेला पण अखंड देश आहे. त्याची अंखडता अबाधित राहिली पाहिजे ही जी भावना प्रत्येक भारतीयाच्या मनात स्वाभाविकपणे वास करते तीच राष्ट्रीय एकात्मता होय.

भारतात फार पूर्वीपासून सांस्कृतिक स्वरूपाची एकात्मतेची भावना होती. अनेक प्रकारचे आचार, विचार, भाषा, रूढी, परंपरा, धार्मिक प्रशासन लाभलेल्या भारतीयांची संस्कृती मात्र एकच होती आणि आहे. या सांस्कृतिक एकात्मतेतून भारत एकसंघ राहिला. पूर्वीची ही एकात्मता सांस्कृतिक स्वरूपाची होती, राजकीय स्वरूपाची नव्हती. खऱ्या अर्थाने इंग्रजांच्या काळात भारत एकछत्री अमलाखाली आल्यानंतरच राजकीय दृष्ट्या एक झाला. दळवळणातील प्रगती, आगगाडीचा प्रारंभ, पोस्ट व तारायंत्र यांनी सुरुवात इंग्रजी शिक्षणाचा प्रसार इ. मुळे भारतीयत्वाची - राष्ट्रीयत्वाची भावना विकसित व दृढमूल झाली.

जुलमी इंग्रज साम्राज्यवाद्यांनी, वसाहतवाद्यांनी जेव्हा येथे तळ ठोकला व साम्राज्य पसरवले तेव्हा त्यांचे जोखड झुगारून देण्याच्या प्रक्रियेने भारताच्या राष्ट्रीयत्वाला थोडा आकार मिळण्यास सुरुवात झाली.

त्यावेळी राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न म्हणजे एका अर्थाने स्वातंत्र्य मिळवण्याचाच प्रश्न होता असे मानले तरी चालेल. अवघा हिंदी समाज स्वातंत्र्य प्राप्तीसाठी उभा राहतो आहे हे लक्षात येताच ब्रिटीशांनी 'Divide and Rule' 'फूट पाडा व राज्य करा' असे धोरण अमलात आणले व धर्मभेद, स्पृश्य-अस्पृश्य असे विषारी विचार भारतीय समाजात भिनविण्यास सुरुवात केली. या देशातून जाता-जाता हिंदुस्थानची फाळणी करून भारतीय उपखंडात कायमचा तणाव निर्माण करून ठेवला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वातंत्र्याचे रक्षण व प्रगती हाच एकात्मतेचा प्रश्न होता. पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरुंनी पंचवार्षिक योजनेद्वारा प्रगतीचे मार्ग खुले केले व समर्थ, स्वावलंबी भारत साकारणे हे राष्ट्रीय एकात्मतेचे परिमाण झाले.

पं. जवाहलाल नेहरु म्हणतात, " राष्ट्रीय एकात्मतेची गरज ही केवळ नैतिक हेतूसाठी निर्माण होत नाही. तिच्या पाठीमागे नैतिक कारण तर आहेच, पण जग आज असे आहे आणि ज्या पद्धतीने जगाची जडणघडण होत आहे ती पाहता राष्ट्रीय एकात्मता ही राष्ट्र म्हणून जिवत राहायला देखील आवश्यक आहे. आपल्या विकासाच्या योजनांना गती मिळायची असेल तर राष्ट्रीय एकात्मता ही एक व्यवहारिक गरज आहे."

"स्वातंत्र्यानंतर भारतासमोर मूलभूत प्रश्न राष्ट्रीय एकात्मतेचा आहे. राष्ट्रीय एकात्मता पूर्ण झाली असली तरी ती पुरेशी नाही. आपण राजकीय ऐक्यापेक्षा जास्त मूलभूत स्वरूपाचा बदल करावयास हवा. यास विलंब

लागेल. हे काम केवळ कायद्याने होणार नाही. त्यांच्या वृद्धीसाठी योग्य ते वातावरण निर्माण करणे आवश्यक असून त्यास प्राधान्य दिले पाहिजे. म्हणून भारतासमोरील आजचा प्रश्न राजकीय ऐक्यापेक्षा मानसिक एकात्मतेचा आहे. प्रांतवाद, जातीयवाद, वगैरे देशाच्या ऐक्यावर हल्ला करणारे बाद नष्ट करून देशाची एकात्मता बळकट करायला हवी.''

याचवेळी भारतीयांच्या प्रगतीत व्यत्यय आणण्यासाठी भारतावर परकीय आक्रमणे लादली गेली व एकापरीने युद्धे लादली गेली. १९६२ व १९६५ मध्ये अनुक्रमे चीन आणि पाकिस्तान या शेजारील राष्ट्रांनी आमच्यावर लष्करी आक्रमण केले. त्यावेळी तमाम भारतीय जनतेने सामर्थ्य व एकजुटीचे प्रदर्शन घडवले. मला आठवते की १९६२ मध्ये दिल्लीच्या प्रचंड सभेत श्रीमती लता मंगेशकर यांनी 'ऐ मेरे वतन के लोगो' हे गीत गायले व पंडितजींसह सर्वांचे डोळे पाणावले. त्यावेळी स्वातंत्र्यरक्षणाचा प्रश्न उद्‌भवल्याने राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन पुनः प्रत्ययास आले.

नैसर्गिक आपत्ती, राष्ट्रीय संकट, परचक्र अशा आव्हानांच्या वेळी भारतीय जनता जात, धर्म, प्रांत या सर्व भेदभावना विसरून अशा आव्हानांचा मुकाबला करते हे आपण आताच वरच्या परिच्छेदात पाहिले आहे व तसे अनेकवार सिद्ध झाले ही आहे. परंतु आपत्ती निवारणासाठी अथवा राष्ट्र संरक्षणार्थ उपयुक्त ठरलेली ही एकात्मताभावना परिस्थिती सुधारण्यासाठी वा राष्ट्रनिर्माणासाठी समर्थ ठरत नाही या गोष्टीचे गांभीर्यपूर्ण आत्मचिंतन करणे आवश्यक आहे. या श्री. बाळासाहेब भारदे यांच्या मताशी माझ्याप्रमाणे आपणही सहमत असलाच.

१९८५ साली गुजराथ राज्यात 'राखीव जागांच्या' संदर्भात दंगली व हिंसाचार झाला. त्या दंगलींमध्ये अनेक ठार व शेकडो जखमी झाल्याच्या बातम्या आपण सर्व जणांनी वाचल्या आहेत. उत्तर प्रदेश व बिहारमध्ये जमीनदार व भूमिहीन किसान अथवा स्पृश्य-अस्पृश्य यांच्यात अनेकवेळा संघर्ष झाले आहेत व कुटुंबेच्या कुटुंबे उध्वस्त झाली आहेत एवढेच नव्हेतर त्याचे लोण अधिक प्रमाणात पसरल्याने अधिक नुकसान अजूनही होत आहे.

पश्चिम बंगालमध्ये 'गुरखालँड' साठी जवळ जवळ नेहमीच संघर्ष होत आहे आणि दार्जिलिंग व आसपासचा प्रदेश कायमचा अशांत व स्फोटक म्हणून खदखदत असतो. पंधरा दिवस, एक महिना अशा दीर्घकालीन बंदचे आवाहन होत असते व तेथेही दंगे व हिंसाचारात जनसामान्यांचे जीवन होरपळून निघत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

या खेरीज मध्यप्रदेश, विदर्भ, तामिळनाडू, आंध्र या राज्यांमध्ये नक्षलवादी चळवळ करणारे अधूनमधून डोके वर काढीतच असतात व त्यावेळी तेथील कायदा व सुव्यवस्था यांची स्थिती डबघाईला येते आणि त्या प्रदेशात दहशतीचे वातावरण निर्माण होते. आणि त्याठिकाणी काही रक्तपात व गटा-गटात संघर्ष सुरु झालेले आपण वाचतो.

हिंदु-मुस्लिम संघर्ष तर वारंवार होतातच तो सध्यातर जणू काही नित्यनैमित्तिकच झाला आहे. बाबरी मशीद प्रकरण, रामजन्मभूमी प्रकरण, अलिगढ, औरंगाबाद, पैठण, ठाणे, भिवंडी, पुणे इत्यादि ठिकाणी. अलिकडे तर थोडी ठिणगी पडली तरी तावडतोब आगीचा डोंब उसळतो व बघता बघता सर्व वस्ती अथवा काही दुकाने, घरे खाक होतात. वाहनांचे नुकसान होते व मोठ्या प्रमाणात दंगल होऊन संपूर्ण जन जीवन केवळ विस्कळित होते असे नव्हे तर ठप्प होते. गरीब मजूर व नोकरीपेशा करणाऱ्यांचे अतोनात नुकसान होते व वित्त आणि जीवनहानी होते. याखेरीज भीती, अविश्वास, गुंडगिरी इ. भावनांच्या अमलाखाली जनात राहू लागते.

दक्षिणेत तामिळनाडू, आंध्र प्रदेश, केरळ इ. राज्यांत हिंदी भाषेविरुद्ध आंदोलने अधून-मधून होत असतात व

जे दुसऱ्यांना स्वातंत्र्य नाकारतात ते स्वतःच स्वातंत्र्यासाठी लायक नसतात.

काहीवेळा तर भारतीय संविधानाची प्रत ही जाळल्याचे आपल्या स्मरणात असेल. ही प्रत जाळण्यात काही प्रांतिक कायदेमंडळाचे सदस्य होते ही तर अधिकच गंभीर गोष्ट आहे.

आजची आपल्या देशाची स्थिती म्हणजे 'भारतीयांशिवाय असलेला देश म्हणजे भारत' अशी झाली आहे. भारतीय नागरिकांमध्ये जवळजवळ सर्व थरात आज राष्ट्रीयत्वाच्या भावनेची उणीव दिसून येते ही अतिशयोक्तीची गोष्ट नसून उघड सत्य आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. या देशात ब्राह्मण, मराठा, लिंगायत, गौड, चेट्टियार, रेड्डी, नायडू, नायर, मेनन, सिंग, राव, चॅटर्जी, बॅनर्जी इ. जाती आणि उपजाती आहेत. तर तामिळ, मल्याळी, कन्नड, बंगाली, मराठी, गुजराथी, हिंदी, उर्दू, सिंधी, इंग्रजी इत्यादि अनेक अथवा शेकडो बोलीभाषा आहेत. तसेच हा देश हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, शीख, बुद्ध इ. विविध धर्मियांचा आहे. या देशामध्ये विविध राजकीय पक्ष आहेत. त्यापैकी काही प्रादेशिक पक्ष राष्ट्रीय एकता धोक्यात आणतात असे कधी कधी वाटते तर कधी कधी राष्ट्रीय पक्ष अराष्ट्रीय विचार करतात असे दिसून येते. तर हा देश 'भारतीयांचा' नाही असा विचार मनात का डोकावतो तर हा भारततला मनुष्य जातीयवादी, भाषावादी, प्रांतवादी, संकुचित मतवादी, सांप्रदायिकतावादी, धर्मनिष्ठवादी आणि अशाच विविध स्वार्थवादी प्रवृत्तींनी पछाडलेला आहे. फक्त तो राष्ट्रीयतावाद्यांचा नाही; आणि म्हणूनच तो भारतीयांचा नाही असे सखेद म्हणावेसे वाटते. आजच्या भारताचे खरेखुरे चित्र हे आहे.

वर वर्णन केलेले भेद, संघर्ष, फूट, हेवेदावे याखेरीज वर्तमानपत्रांमध्ये रोज प्रसिद्ध होणाऱ्या आणि आकाशवाणी व दूरचित्रवाणीद्वारा प्रक्षेपित होणाऱ्या बातम्यांकडे लक्ष दिल्यास पंजाबमधील २०-२५ हत्यांची बातमी तर जवळ जवळ रोजच ऐकू येते. निरपराध लोकांची खलिस्तानवाद्यांकडून हत्या झाली नाही असा एकही दिवस नाही. हा नरयज्ञ सुरुच आहे. सुरुवातीस काही लोकांना अशा बातम्या ऐकून सुन्न वाटायचे व मन बधीर व्हावयाचे पण गेले सुमारे पाच वर्षे ह्या बातम्या प्रतिदिन अव्याहतपणे ऐकाव्या व वाचव्यां लागत असल्याने माणसांच्या प्रतिक्रिया बदलू लागल्याचे दुर्दैवाने जाणवते व सामान्य माणसाच्या संवेदनाच थिजल्या आहेत की काय असे वाटू लागले आहे.

म्हणूनच देशातील प्रत्येक जबाबदार नागरिकाने शक्य त्या सर्व मार्गांनी व प्रयत्नांनी देशाची राष्ट्रीय एकात्मता टिकविणे हे आपले आद्य कर्तव्य मानले पाहिजे. त्यामध्ये शिक्षणक्षेत्राचा फार मोठा आणि मोलाचा सहभाग आहे हे विसरून चालणार नाही.

राष्ट्रीय एकात्मता भारतात निर्माण व्हावी व टिकून रहावी यासाठी व्यक्तीविकास जास्तीतजास्त व्हावा या उद्देशाने भारताच्या राज्यघटनेने प्रत्येक भारतीय नागरिकास जे मूलभूत अधिकार बहाल केले आहेत ते जाणून घेणे अगत्याचे आहे. ते खालीलप्रमाणे आहेत-

१) समानतेचा अधिकार - राज्य कोणत्याही व्यक्तीस कायद्यांचे समान संरक्षण नाकारू शकत नाही. समानतेच्या अधिकारात सामाजिक समानता समाविष्ट असते. याचा अर्थ धर्म, वंश, जात, लिंग वा जन्मस्थान यांच्या आधारे कोणाही विरुद्ध भेदभाव केला जाणार नाही. अस्पृश्यता पाळणे हे समानतेच्या विरुद्ध आहे.

२) स्वातंत्र्याचा अधिकार - भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्वक, निःशस्त्र एकत्र येण्याचे स्वातंत्र्य संघटना स्वातंत्र्य, भारतीय राज्यक्षेत्रात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य, कोठेही स्थायिक होण्याचे व व्यवसाय आचरण्याचे स्वातंत्र्य.

३) शोषणाविरुद्ध अधिकार-समाजातल्या दुर्बल घटकांचे शोषण होऊ नये यासाठी आपल्या राज्यघटनेने काही तरतुदी केलेल्या आहेत. माणसांची विक्री, वेठ-

विगार, सक्तीची मजुरी यांना राज्यघटनेने प्रतिबंद केला आहे.

४) धर्मस्वातंत्र्याचा अधिकार - सद्सद्विवेक बुद्धीच्या स्वातंत्र्याची आणि धर्म मुक्तपणे आचरण्यांची, प्रसार व प्रचार करणाऱ्या अधिकाराची प्रत्येक नागरिकाला हमी मिळाली आहे; परंतु सार्वजनिक व्यवस्था, नीतिमूल्य व आरोग्य यांच्या हिताच्या दृष्टीने बंधन सांभाळण्याची जबाबदारी आहे.

५) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार-या अधिकाराद्वारे भारताच्या प्रत्येक नागरिकाला स्वतःची भाषा, लिपी व संस्कृती जतन करण्याचा अधिकार दिलेला आहे. राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून सहाय्य मिळालेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही भारतीय नागरिकास केवळ धर्म, वंश, जात किंवा भाषा यांपैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

६) सनदशीर उपाय योजनेचा अधिकार - राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीकरिता सर्वोच्च न्यायालयात किंवा उच्च न्यायालयात अर्ज विनंती करण्याचा अधिकार भारतीय नागरिकास मिळाला आहे.

वर उल्लेख केलेल्या मूलभूत अधिकारां खेरीज भारतीय राज्य घटनेत काही मूलभूत कर्तव्यांची देखील एक यादी समाविष्ट करण्यात आली आहे, त्यापैकी काही ठळक कर्तव्ये -

१) संविधानाचे पालन करणे आणि त्यात नमूद केलेले आदर्श, संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.

२) ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यालढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची नागरिकाने जोपासना करून अनुकरण करणे.

३) भारताची सार्वभौम सत्ता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे.

४) आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.

५) अखिल भारतीय जनतेमध्ये सुसंवाद व बंधुता वाढीला लावणे व स्त्रियांच्या प्रतिष्ठेचा मान राखणे.

६) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे महत्त्व जाणून त्याचे जतन करणे.

७) अरण्ये, सरोवरे, नद्या व अन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगणे.

८) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे

९) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

अशा प्रकारे भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत हक्क व अधिकारांची जाणीव सध्या फारच कमी प्रमाणात व्यवहारात दिसून येते. कर्तव्याशिवाय अधिकार असू शकत नाही. मला जर जीविताचा व कोठेही भारतीय राज्यक्षेत्रात निवास करण्याचा हक्क आहे तर इतरांच्या तसल्याच अधिकारांचा आदर राखणे माझे कर्तव्य आहे. आपली कर्तव्ये पार पाडूनच आपल्या समाजात आपल्याला अधिकार प्राप्त होतात याचा बऱ्याच लोकांना सध्या विसर पडलेला असल्याने राष्ट्रीय एकात्मतेला तडे जात असल्याने दुःखद चित्र दिसत आहे.

श्री. सुहास ना. साठे
श्रीनंदनवन अपार्टमेंट्स, मुरारी ब्लॉक नं. ९,
पाईपलाईन रोड, लुईसवाडी, ठाणे ४०० ६०४.

•••

राजकीय शक्ती बंदुकीच्या नळीत वाढते.

# सारीपाट

श्री. राजेश राणे

*(आज समाजात अनेक प्रकारे फसवणूक करणारे लोक सर्वत्र आहेत. त्यांच्या बेमालूम फसवणुकीला बळी न पडणं हे गरजेचं. त्यासाठी अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. असा विचार करायला लावणारी पारितोषिक प्राप्त एकांकिका. - संपादक)*

**पहिला प्रवेश**

*(प्रथम दर्शनी स्टेजवर बाग. एखादं गाणं सुरु होतं. तो बागेत येतो. घड्याळाकडे अधूनमधून पहात तिची वाट पहात असतो.)*

(पात्र :- संकेत, अबोली, संदेश)

**संकेत** - अजून कशी आली नाही ? वाटतं ट्रेन लेट असेल! मुंबईत वेळेवर धावतील त्या ट्रेन कसल्या. ह्यामुळे भेटींचे किती तास वाया जातात. मग अबोलीचं सुरु होत, मी निघते, हॉस्टेलच्या मॅडम ओरडतात. अबोली थोडे दिवस, मला नोकरी मिळू दे. मग आपण लग्न करु. स्वतःच घर घेऊ.

(तेवढ्यात अबोली येते.)

**अबोली** - संकेत, संकेत काय रे कुठे हरवलास !

**संकेत** - हा इथेच. जत्रेत नाही (दोघ हसतात)

**अबोली**-सॉरी उशीर झाला नेहमीप्रमाणे.

**संकेत**-२५मि. गाड्या उशीराने धावतील. नेहमीचं आहे. ह्याना कळत कस नाही ?

**अबोली** - काय ?

**संकेत** - आपल्या भेटीचे किती क्षण वाया जातात.

**अबोली** - असं भेटण्यातच खरी मजा असते.

**संकेत**- अग, पण ह्या डोळ्यांना किती सजा असते.

**अबोली** - वा ! वाक्य छान होत. अगदी...(पर्समधून गजरा काढते) ह्या गजऱ्यासारखं (ती संकेत कडे गजरा देते)

**संकेत**-तू गजरा आणायचा आणि मी माळायचा

**अबोली**-प्रेमात हे असं असतं.

**संकेत**-अबोली, तुला माहित आहे सर्वात सुंदर फुल कोणतं?

**अबोली** -कोणतं ?

**संकेत** -छोट्याश्या पाकळ्यांचं छोटंसंच हे फूल... मोगरा. सुगंधानं सर्वांना आपलंसं करणारं ! दोन मनांचा दुरावा दूर करणारा ! नुसतं नाव उच्चारलं तरी सुगंध दरवळतो.. नाहीतर तुझं नाव-अबोली ! असं कसं ग तुझं नाव? कुणी ठेवलं ?

**अबोली**-तुला आवडत नाही ? संकेत, आश्रमातले सगळे म्हणायचे की, मी लहानपणापासूनच अशी अबोल, शांत, मुकी अगदी अगदी एकटी म्हणूनचं ताईंनी माझं नाव 'अबोली' ठेवलं! हो, जाऊ दे. ए, संकेत.

**संकेत**- अं

**अबोली**-तू ना ... लग्नानंतर माझं नाव बदल

**संकेत**-नाव बदलू? नक्की ? कोणतं बरं नाव ठेवू ? अं !अं! मंजुषा-आरती-सोनल-सुगंधा, मोहिनी

**अबोली**-बस् बस् बस् ! अजून कॉलेजच्या सगळ्या मुलींची नाव तोंडपाठ आहेत वाटतं ?

**संकेत**-शाळा-कॉलेजचे दिवस म्हणजे एक वेगळंच विश्व. त्या विश्वातून बाहेर पडलं की सगळं सगळं वेगळं. पेपरच्या जाहिराती वाचून नोकऱ्या शोधायच्या पण त्या ही मिळत नाहीत. सगळा भ्रष्टाचार ! भ्रष्टाचार!

**अबोली**-पुन्हा तू त्याच विषयाकडे वळलास,मी आहे ना.

**संकेत**-पण हे किती दिवस ?

**अबोली**-जो पर्यंत नाव बदलत नाहीस तो पर्यंत.

**संकेत**-आपल्याकडे नावांची यादी आहे.

**अबोली**-इतका फेमस होतास. तुझ्या बरोबर मुली असायच्या त्या वेळी तू नक्कीच प्रेम केलं असशील.

**संकेत**-प्रेम? अबोली, अफेअर तो बहोत किये है मगर प्यार किसीसे नही किया ।

**अबोली**-काय सांगतोस ? अफेअर? तू मुलींना चक्क आवडायचास ? जरा शंकाच वाटते.

**संकेत**-माझ्या हाईट आणि चेहऱ्यावर जाऊ नकोस. माझ्यासारखा हरहुन्नरी मुलगा जगात कुठे शोधून सापडायचा नाही.

**अबोली**-म्हणूनच तर मी कुठे शोधायला गेली नाही. इथेच वागेत आयताच सापडला. पण मला नवलचं वाटतं तुझ्यामागे मुली..... (ती हसते.)

**संकेत**-हसू नकोस, फुकट टूथपेस्टची अ‍ॅड होईल. त्याचं काय आहे. कॉलेजमध्ये असताना मी नकला करण्यात पटाईत. कुणाचीही नक्कल हुबेहुब करायचो. दुसऱ्याच्या कविता वाचणं माझा आवडता छंद. एखाद्या ऑफ लेक्चरला मुलींच्या घोळक्यात मी आणि एखाद्या कवीची कविता. ऐकताना मुली तल्लीन होऊन जायच्या, भाराऊन जायच्या ! अबोली छान छान बोलण्यानी जग फसतं.

**अबोली**-असं तुला वाटतं ! पण खरचं छान छान बोलण्याने जग फसतं ! मला ऐकवना एखादी कविता.

**संकेत**-कविता ? कविता कशी नाजूक असते. लहानशा नखभर ब्लेडवरच्या अणकुचीदार धारेसारखी. बोटांची पकड किंचित चुकली तरी रक्तबंबाळ करणारी... पण हवीहवीशी मुसळधार पावसातल्या एखाद्या हुरहुर लावणाऱ्या आठवणी सारखी. अशीच ऐक मुसळधार पावसातली कविता. अबोली, ऐक... ऐकतेयसना.

**अबोली**-(तिचं लक्ष नसतं, जरा गोंधळून ऐकतेना), बोल बोल

**संकेत** -मुसळधार पाऊस खिडकीत उभा राहून पहा,
बघ माझी आठवण येते का ?
हात लांबवत
तळहातावर झेल पावसाचं पाणी
इवलसं तळं पिऊन टाक
बघ, माझी आठवण येते कां?

वाऱ्यावर उडणारे पावसाचे थेंब चेहऱ्यावर घे
डोळे मिटून घे, तल्लीन हो
... नाहीच जमलं काही.. तर बाहेर पड
समुद्रावर ये
तो उधाणाला असेलच
पाण्यात पाय बुडवून उभी रहा,
वाळू सरकेल पायाखालून
बघ, माझी आठवण येते कां?

मग चालू लाग
पावसाच्या अगणित सुया टोचून घे
चालत रहा पाऊस थांबेपर्यंत
तो थांबणार नाहीच
शेवटी घरी ये
साडी बदलू नकोस, केस पुसू नकोस
पुन्हा त्याच खिडकीत ये
आता... नवऱ्याची वाट बघ
बघ, माझी आठवण येते का

दारावर बेल वाजेल...
दार उघड...
''नवरा असेल''...
त्याच्या हातातील बॅग घे
रेनकोट तो स्वतःच काढेल

---

थोरांचे जीवन कधीच नष्ट होत नाही ते अखंड चालूच रहाते.

तो विचारील तुला-तुझ्या भिजण्याचं कारण
तू म्हण, घर गळतयं
मग चहा कर-तू ही घे
तो उठून पंकज उधास लावील
तू तो बंद कर,
किशोरीचं सहेला 'रे' लाव
बघ, माझी आठवण येते कां...

मग, रात्र होईल... तो तुला कुशीत घेईल
म्हणेल, तू मला आवडतेस
पण तू ही तसंच म्हण
मग विजांचा कडकडाट होईल
ढगांचा गडगडाट होईल
तो त्या कुशीवर वळेल
त्याच्या पाठमोऱ्या शरीराकडे बघ
बघ, माझी आठवण येते का....

यानंतर... सताड डोळ्यांनी
छप्पर पहायला विसरु नकोस
यानंतर...
बाहेरचा पाऊस नुसता ऐकण्याचा प्रयत्न कर
यानंतर....
उशी खाली सुरी घे
झोपी जाण्याचा प्रयत्न कर...
येत्या पावसाळ्यात
एक दिवस तरी
बघ, माझी आठवण येते का....

**संकेत**-अबोली... अबोली ! ए वेडाबाई कुठं हरवलीस? एका भाववेड्या 'सौमित्र' नावाच्या कवीची ही कविता आवडली?

**अबोली** - हो! खरंच, फारच छान... किती छान बोलतोस. ऐकत रहावंसं वाटतं.

**संकेत**-मग ऐकत रहा ना... दुसरी ऐकवू

**अबोली**-नको, नंतर कधीतरी. आता मी निघते, निघू.

**संकेत**-एवढ्यात ? थांब ना थोडा वेळ.

**अबोली**-नको रे जायला हवं.

**संकेत** - अबोली... ए अबोली. तू मला... मला सोडून तर जाणार नाहीस ना ? सांगना ? तू गप्प का? बोल ना... अग मला एकटेपणाची भिती वाटते. मनात नको ते विचार येतात. पुन्हा पुन्हा तेच तेच आठवत रहातं. दारिद्र्य, बेकारी, उपासमार, अपमान... दुःख-दुःख ! वाटतं.. वाटतं या कवितेच्या स्वप्नाळू दुनियेतून बाहेर पडावं. एखाद्या गँगमध्ये सामील व्हावं. खून-दरोडा-जाळपोळ करावी, पैसा मिळवावा, अफाट पैसा-श्रीमंत ! खूप श्रीमंत व्हावं.

**अबोली**-मग काय होईल ?

**संकेत**-मग जगातली सगळी सूखं पायाशी.. अबोली, माणसाचा सर्वात जवळचा शत्रू कोण माहितोय?

**अबोली**-कोण?

**संकेत**-त्याचं एकटेपण ! ते त्याला काय करायला लावेल याचा नेम नाही ! या जगात माणूस त्या एकटेपणालाच घाबरतो.

**अबोली**-खरयं संकेत, या एकटेपणालाच माणूस घाबरतो.

**संकेत**-पण अबोली, आज माझा एकटेपणा तुझ्यामुळे दूर होतोय. आता वाटू लागलयं की माझं हे काम पूर्ण होईल.

**अबोली**-कसलं काम?

**संकेत**-म्हणजे तुझ्या येण्यानं माझ्या मनावरची निराशा दूर झालीय. एका नव्या जोमात मी काहीतरी करायचं ठरवलयं. अबोली ! अबोली!

**अबोली**-संकेत, संकेत ! मी निघते फार उशीर होतोय! हॉस्टेलमध्ये जायला उशीर झाला तर त्या मॅडम रागवतात, उद्या ऑफिसलाही जायचयं.... उद्या संध्याकाळी परत तुला भेटायचयं.

---

**आपण स्वतःला जितके समजतो तितके सुखी किंवा दुःखी कधीच नसतो.**

**संकेत**-अबोल उद्या लवकर ये, लवकर येण्याचा प्रयत्न कर.

**अबोली**-का ? काही खास?

**संकेत**-खासच ! तुझा वाढदिवस.

**अबोली**-वाढदिवस ! अय्या हो की ! तुझ्या तारीख बरोबर लक्षात राहिली ! मी तर विसरुनच गेले होते.

**संकेत**-मला विसरुन कसं चालेल ! तुला काय प्रेझेंट देऊ?

**अबोली**-काय देशील तू मला ?

**संकेत**-काय पाहिजे ते. वाट्टेल ते. तू माग. मी दिलं समज.

**अबोली**-नक्की देशील? प्रॉमिस ?

**संकेत**-प्रॉमिस ! मागून तर बघ !! हा बंदा तूझ्यासाठी काय वाट्टेल ते करेल.

**अबोली**-बघ हं, ऐनवेळी म्हणू नको, 'शक्य नाही' म्हणून.

**संकेत**-नाही म्हणणार. वचन दिलयं-तू मागून तर बघ.

**अबोली**-ठिकाय-मी मागेन, जरूर मागेन पण उद्या!

**संकेत**-उद्या?

**अबोली**-हो उद्या... आता निघते मी फारचं उशीर होतोय. (ती जाते. तो पाहतो, किंचित हसतो आणि निघून जातो. रंगमंचाचा दुसरा भाग उजळतो. तिथे बुद्धीबळाचा पट खेळत बसलेला तरुण, मुखवस्तू थाटाची अशी भोवतालची परिस्थिती.)

**दूसरा प्रवेश**

**संदेश**-बुद्धीबळाच्या पटासारखं असतं आपलं जगणं. आशा इच्छांची ऐकेक खेळी... क्षणात जीत.. क्षणात हार.. शरीराचा अवयव हिरावून नेणारा नियतीचा हा क्रूर खेळ... कणाकणानं अपंग करणारं हे कचखाऊ मन... आपली जीत हवी असेल तेव्हा एखाद्या निष्पाप.. निरागस प्याद्याचा बळी.. आपण सारे प्यादे या खेळातले... सूत्र मात्र कोणा तिसऱ्याचं... तो कळसूत्री सारखं नाचवतो आपल्याला. कधी या पटात कधी त्या पटात... सारीपाटच जणू काही एखादा....

(तेवढ्यात अबोली येते)

**अबोली** -.. मी आलेय ...

**संदेश**- अबोली आज उशीरा

**अबोली**-अरे संकेत ना...

**संदेश**-काय?

**अबोली**-अं... न... नाही, काही नाही.

**संदेश**-कुठवर आलं आपल नाटक ? तो तुझ्या प्रेमात कितीसा गुंतलाय? की तू.. म्हणजे... आय मीन्... या पुढे काय करायचं आपल्याला... म्हणजे तुला...

**अबोली**-संदेश प्लीज ! मला माहिताय मला नक्की काय करायचं ते. तू पुन्हा तीच भीती -तीच शंका कशाला काढतोयस.

**संदेश**-सॉरी... सॉरी खरचं! मी सहजच विचारलं... मला कळत तू केवढी मोठी रिस्क घेऊन ... एनी वे जरा गोंधळलेली वाटलीस म्हणून विचारल... थकलीस? बरं वाटतं नाही का? चहा घेणार? करु?

**अबोली**-नको, मी-मी ठिकाय्... ती औषधं घेतलीस.

**संदेश**-हं !

**अबोली**-ते... कदम वकील दिसले. इथ आले होते ? कशाला?

**संदेश**-सांगितलं ना... ऑफिसचे काम होतं म्हणून, तू त्या भानगडीत लक्ष देऊ नकोस... सॉरी नंतर सांगेनच ना! हा डाव बघ कसा रंगतो आहे.

**अबोली**-एकटाच काय खेळत बसलायस ?

**संदेश**-एकटा... एकटा खेळतानाच खरी मजा असते... ह्या एकटा खेळण्यात एक बरं असतं. आपल्याला हारण्याची भीती कधीच नसते कारण प्रतिस्पर्धी आपणचं असतो. आपले... खेळात, जीवनात, प्रेमात... शेवटी हे प्रेम म्हणजे सुद्धा एक-एक सारीपाटच जणू काही

**अबोली**-असं का म्हणतोस संदेश ? काय झालं? आज इतका अपसेट?

**संदेश**-अपसेट? दुःखी? छे. गं तुला माहीत आहे या दुनियेत सगळ्यात अपसेट...सगळ्यात दुःखी कोण असतं ते ? अबोली, पाण्यातला मासा... त्या माशासारखी माझी अवस्था झाली आहे, ज्याने ढाळलेले अश्रू कोणालाच दिसत नाहीत, पाणी अखेर पाण्यातच विरघळतं... हरवतं.

**अबोली**-संदेश माझं काही चुकलं का ? असं काय बोलतोहेस तू ? परकं का समजतोस मला?

**संदेश**-काही नाही ग, उगीच... पण भीती वाटतेय. तुला कोणीतरी माझ्यापासून हिरावून नेईल याची..

**अबोली**-वेडाआहेस... अरे तुझा माझ्यावर विश्वास नाही!

**संदेश**-विश्वासाचा प्रश्न नाही गं अबोली. अगं आपलं हे चंचल मनच असं आहे, माणसाकडून कधी काय करुन घेईल ते सांगता यायचं नाही.

तू... तू माझ्यापासून दूर जाणार नाहीस ना?

**अबोली**-तसं कधीही होणार नाही संदेश! अरे, संसाराची जी स्वप्न मी तुझ्यासोबत पाहिली ती अशी उध्वस्त होऊ देईन का मी ? मी तुझ्यासोबत आयुष्याच्या प्रत्येक पावलावर, प्रत्येक संकटात, अगदी शेवट पर्यंत साथ देणारं

**संदेश**-अबोलीऽऽऽऽ

**अबोली**-तुला अद्याप माझं प्रेम समजलं नाही असं समजू का?

**संदेश**-तसं नाही. पण तू-तुझं प्रेम आता... कोणता निर्णय घ्यावा, आपण कोणाला फसवायचं ?

**अबोली**-अरे मी... मी तुझ्यासाठी माझं सारं आयुष्य पणाला लावलयं. हे-हे-जे काही चाललंय ते सारं करायचं ठरवलं तेव्हा तू माझ्या भावनांचा विचार केला नव्हतास? मी मनावर दगड ठेऊन सारं नाटक करते आहे. कोणासाठी करते आहे ? का करते आहे?

**संदेश**-रागावलीस ? सॉरी अबोली...प्लीज रडू नकोस... प्लीज.. प्लीज.. मला समजून घे. मला राहून राहून भीती वाटू लागली आहे.

**अबोली**-कसली भिती ? काय होतयं तुला?

**संदेश**-अबोली अगं वयाच्या पंधराव्या वर्षी खेड्यात कवाडकष्ट करुन शिक्षण पूर्ण केलं. अंगमेहनत, बुद्धी, यश, नशीब... ह्या साऱ्याच्या जोरावर मोठा होत गेलो. हा छोटासा बिझनेस उभारला याचा व्याप केवढा मोठाय् याचा अद्याप तुलाही अंदाज नाहीय अबोली... सगळं आहे माझ्यापाशी, पण काहीहीं नाही.... हे शरीर साथ देत नाही... ऐन तारुण्याच्या, उमेदीच्या बहारात माझ्या दोन्ही किडनी फेल झाल्यात... सालं आपलं नशीबचं फुटकं

**अबोली**-असा निराश होऊ नको! आपण प्रयत्न केले ना?

**संदेश**-पण त्यांना यश आलचं नाही? पेपरमधल्या जाहिरातीला कोणीही भुललं नाही. जे भूलले त्यांनी मी कमावलेल सगळं मागितलं. त्यांना सगळं काही दिल्यावर मी कसं जगायचं. माझ्या आई-वडिलांनी कोणाकडे पहायचं. मला काहीच कळत नाही. अबोली... आपला प्लॅन यशस्वी नाही झाला तर... तर....मी .... काय करावं मला काहीचं सुचत नाही.

**अबोली**-असा धीर सोडू नकोस संदेश... अरे, मी आहे ना तुझ्या सोबत.

**संदेश**-तुझी साथ आहे म्हणून तर जगत आलोय मी पण,

असहाय्यपणे!

**अबोली**-असे रे का बोलतोस.

**संदेश**-मी तुला सुख द्यायला अपयशी ठरलो. आश्रमातही तू असंच जीवन...

**अबोली**-संदेश...

**संदेश**-पण एका अर्थी बरचं झालं... तुझं -माझं लग्न होण्याआधीच कळलं... नाहीतर तू मला आयुष्यभर दोष देत...

**अबोली**-असं नको रे बोलूस. तुला मी इतकी वाईट विचाराची वाटते?

**संदेश**-वाईट तू नाहीस हा समाज आहे! म्हणाला असता एका निष्पाप मुलीला फसवलं. पण काय करतोय... तुला मी माझ्या स्वार्थासाठी काय करायला लावतोय.

**अबोली**-आपण स्वखुषीने करतोय का? आणि फसवणूक म्हणशील तर इथं कोणीतरी कोणालातरी फसवूनच जगत असतो. सतत! आपल्या प्रयत्नाचे सगळे मार्ग बंद झाले म्हणून आपण हे पाऊल उचलवं रिस्क तर घ्यावीच लागणार.

**संदेश**-अजून किती दिवस ही रिस्क घ्यायची? मला आता असह्य झालयं अबोली...

डॉक्टरांचा फोन आला होता. म्हणाले दोन चार दिवासात निर्णय कळवा.... नाहीतर... नाहीतर उशीर होईल, काय सांगू मी त्यांना? आता निर्णय तुझ्यावर आहे अबोली.

**अबोली**-डॉक्टरांना कळव, म्हणावं उद्या कळेल आपल्याला.

**संदेश**-उद्या ?

**अबोली**-हो उद्या! मी उद्या संकेतला भेटणार आहे- कदाचित शेवटची!

**संदेश**-ठिकाय! अबोली, डॉक्टर म्हणाले की तू ही त्यांना म्हणे फोन करुन कॉन्टॅक्ट केला होतास? हं!

**अबोल**-हो. आणि तोही तुझ्यासाठीच फक्त.

**संदेश**-नाही! खोटं बोलतेस तू माझ्याशी. तू फोन संकेतसाठी केला होतास... होना.

**अबोली**-अरे त्यानी किडनी दिल्यानंतर त्याचं काय होईल... कसं होईल..

**संदेश**-एवढी काळजी त्याची? अबोली, अगं विसरलीस ज्यावेळी तुला आश्रम सोडावा लागणार होता तेव्हा मीच तुझ्यापाठी खंबीर उभा राहिलो होतो. तुला जॉब मिळवून दिला. तुझी हॉस्टेलमध्ये रहाण्याची व्यवस्था केली. कधी कुठल्या गोष्टीची उणूव भासू दिली का मी ... तुझ्यावर जीवापाड प्रेम केलं. माझा आजार कळला नसता तर... तर एव्हाना आपलं लग्न सुद्धा झालं असतं. आजपर्यंत तू अनाथ आहेस हे जाणवून दिलं नाही. का? कशासाठी? कालपरवा जो कुणी तुझ्या आयुलष्यात आला त्याची इतकी काळजी करावीस ? म्हणून आता वाटतं डॉक्टरांनी तुझी-माझी आश्रमात ओळख करुन दिली नसती तर आज हे सोसावं लागल नसतं. मग गेल्या वर्षभराच्या आपल्या प्रेमाला अर्थ तो काय उरला गं. अबोली? इतकी बदललीस? मी-मी खरचं परका झालोय का तुला ? कि-कि कदाचित, मी हा 'असा' म्हणून तू अशी.

**अबोली**-(तो रडताना त्याला धीर देत) संदेश प्लीजऽऽऽ स्वतःला सांभाळ. संदेश, अरे असा धीर सोडून कसं चालेल! मी तुला कधीच एकटं पडू देणार नाही. माझ्यावर विश्वास ठेव. उद्याच कळेल संकेत माझ्यावर किती प्रेम करतोय ते उद्याचा निर्णय हा शेवटचा असेल.

**संदेश**-सॉरी-सॉरी अबोली! खरचं माफ कर मला. अगं भावनेच्या भरात मी तुला काही बोलून गेलो. मला भानच राहिलं नाही.

---

**अबोली**-नाही संदेश, तू मला माझ्या अस्तित्वाची जाणीव करून दिलीस. आज मला माझी...

**संदेश**-अबोली... तू तरी समजून घे ना मला..

**अबोली**-मी निघते ! फार उशीर झालाय.

**संदेश**-चाललीस? एक मिनिट.... हॅपी बर्थ डे टू यू अबोलीऽऽ हॅपी बर्थ डे

**अबोली**-संदेश, मला वाटलं तू विसरलास

**संदेश**-कस विसरेन ह्या दिवशी आपल्या प्रेमाला खरी सुरुवात -झाली.... आणि ह्या पुढचे दिवस कोणी पाहिले.

**अबोली**-माझ्यावर विश्वास ठेव. उद्याचा दिवस तुझ्याचसाठी असेल. येते मी अच्छा.

**संदेश**-अच्छा!(डॉक्टरांना फोन करतो) हॅलो डॉक्टर, मी संदेश बोलतोय उद्या नक्कीच काम होईल. तुम्ही तयार रहा.

तिसरा प्रवेश

*(बगीचा. संकेत अबोलीची वाट पहात आहे. एकदा घड्याळ नसलेल्या मनगटाकडे खिन्नपणे बघून थोडासा हताश असं हसतो.)*

**संकेत**-आज अबोलीचा वाढदिवस... अबोली माझ्या जीवनात आली आणि जगण्याला एक दिशाच मिळाली जणूकाही, नाहीतर विचार करून करून निराशेच्या भरात आपली पार दशा झाली असती... (अबोली तिथे अचानक येते. तो पहिल्या न पाहिल्यासारखं करून पुढे बोलत रहातो.) आता आपण फक्त अबोलीसाठीचं जगायचं. तिला आजवर न मिळालेलं प्रेम अगदी भरभरून द्यायचं... आनंद-सुख-सारं काही. ह्या मोगऱ्याच्या कळी सारखं-तिची काळजी घ्यायची... (अबोलीकडे लक्ष जाताच दचकतो.) अं... अबोली तू? तू कधी आलीस?

**अबोली**-ही काय आत्ताच. आणि दचकलाच का तू ?

**संकेत**-काही नाही गं तुझाच विचार करत होतो.

**अबोली**-मी काय मागेन ते? लक्षात आहे ना?

**संकेत**-हो, आहे ना, माझ्या लक्षात. बोल... काय हवयं

**अबोली**-संकेत, प्रेमाची व्याख्या काय ?

**संकेत**-व्याख्या? प्रेमाची व्याख्या? कुठे काही शोध लावायचा आहे का सायन्समध्ये ?

**अबोली**-नाही सांगणार तू?

**संकेत**-सांगतो ना ! सो सिंपल! एकमेकांना समजून घेणं, विश्वास ठेवणं आणि दुसऱ्यासाठी स्वतःच आयुष्य उधळून देणं. जसा तू, माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केलास.

**अबोली**-तो वर्षाव मी माझ्या स्वार्थासाठी केला.

**संकेत**-(खळखळून हसतो) जोक करु नकोस. निदान आजतरी माझी अशी थट्टा मस्करी करु नकोस.

**अबोली**-आय अॅम सिरिअस... माझं खरचं त्याच्यावर.... आम्ही दोघं लवकरच...

**संकेत**-कोण तो? तू कोणाबद्दल बोलतेस?

**अबोली**-संदेश त्याच नाव, त्याला.... त्याच्यासाठी...मी...म्हणजे? ट्राय टू अंडरस्टॅंड.

**संकेत**-काय समजून घेऊ ? मला. मला खरचं काही कळत नाहीए. तू काय बोलतेस ते.

**अबोली**-हे बघ स्पष्टच सांगते... मी....मी तुझ्यावर प्रेमाच नाटक केलं!

**संकेत**-नाटक ? प्रेमाचं? तुला तरी कळतय का तू काय बोलतेस? नाही... नाही तुझी तब्येत ठीक नसावी... नाहीतर तू असं काही बडबडली नसतीस वेड्यासारखी.

**अबोली**-खरचं वेड लागलयं मला....

**संकेत**-तू-तू बस इथे... शांत हो. हे बघ मला नीट सांग!

---

कसलं नाटक, कोण संदेश.

**अबोली**-मी... सांगते... संदेश वर्षभरापूर्वीच माझ्या आयुष्यात आला.... अगदी नकळत... सहजपणे, त्याची ओळख डॉक्टरांमुळे. ते आश्रमात मोफत उपचार करायचे... ज्यावेळी मला आश्रम सोडावा लागणार होता तेव्हा खरंतर त्याने मला आधार दिला, राहण्याची व्यवस्था, नोकरी... आम्ही जवळ आलो. नकळत एकमेकांकडे ओढलो गेलो... प्रेमात पडलो... त्याचे माझ्यावर डोंगराएवढे उपकार आहेत.

**संकेत**-संदेशन केलेल्या उपकारांनी दबून जाऊन तर तू त्याच्यावर प्रेम करायला लागलीस! नाही. हे खोटं आहे! मला विश्वास नाही वाटत. तू फक्त माझ्यावर प्रेम करतेस.

**अबोली**-संकेत मी.... तुझ्यावर ...पण...

**संकेत**-पण? पण काय अबोली?

**अबोली**-पण मी कुठल्या परिस्थितीत तुझ्यावर प्रेम करायला लागले ते कसं सांगू? मी तुला फसवलं.

**संकेत**- पण कशासाठी?

**अबोली**-माझ्या आयुष्यात प्रेम हे पहिल्यादांच संदेशच्या रुपानं आलं. ह्या प्रेमासाठी मी वाट्टेल ते करायला तयार आहे. मी तुझ्यावर प्रेम केल तेच मुळी ह्या उद्देशान...

**संकेत**-हे बघ, तू स्पष्ट बोल-माझा मेंदू पार निकामी होत चाललाय...

**अबोली**-संकेत माझ्या संदेशच्या दोन्ही किडनीज फेल झाल्यात. आमच्या डॉक्टरांनी सांगितलय. थोड्याच दिवसात संदेशला एखादी किडनी नाही बसवली तर तो... तो... हो बघ, संकेत वेळ फार थोडा उरलाय.. मी तुला मनापासून विनवणी करतेय, तू संदेशसाठी तुझी एक किडनी दान देशील?

**संकेत**-अच्छा.. अच्छा... म्हणजे असा प्रकार तर.. तेव्हाच हो आय् सी.... असयं तर

**अबोली**-होय.. मला... मला... समजून घे... संकेत तू मोठ्या मनाचा आहेस! तू मला हवी असलेली वाढदिवसाची भेट....

**संकेत**-माझा विचार केलास? मी काय दानशूर कर्ण किंवा हरिश्चंद्राचा अवतार वाटलो? अगं तुझ्यासाठी मी अख्ख आयुष्य उधळून देईन अबोली, तुझ्या प्रत्येक इच्छेला माझी गरज समजून जगेन... मरेनही. मी माझ्या आधीच होरपळलेल्या आयुष्याचं वाटोळ करु सांग? (त्याचवेळी संदेश बागेत हळूच येऊन आडोशाला उभा राहून त्याचं बोलणं ऐकत असतो.)

**अबोली**-संकेत म्हणजे तू.... ठिकाय.. पण तू मला वचन दिलं होतसं, विसरलास? माझ्यासाठी काय वाट्टेल ते करेन... मी मागेन ते देशील... माझ्या वाढदिवसाला.

**संकेत**-वाढदिवस? ज्याच्यासोबत वाढदिवस साजरा करायचा सोडून... तू खरचं ग्रेट आहेस... एक विचारु.

**अबोली**-काय?

**संकेत**-तू...तू का नाहीस तयार होत संदेशला...

**अबोली**-अरे मी...

**संकेत**-मी समजू शकतो अबोली.. ठिकाय् मी-मी तयार आहे!

**अबोली**-संकेत, खरचं-खरचं तू? प-पण-मग -ती- तुझं...

**संकेत**-माझी काळजी करु नकोस मी...

(तेवढ्यात आडोश्याआडून संदेश बाहेर येतो)

**संदेश**-अबोली मी जेव्हा या संकेतवर प्रेमाचं नाटक करायला सांगितलं तिथेच तुझे, प्रेम हरवून बसलो...

---

संगणक व विज्ञान ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत.

**अबोली**-तू काय बोलतोहेस संदेश? अरे मी... काही..

**संदेश**-अबोली, माझ्याहून कितीतरी जास्त प्रेम करतोय तो तुझ्यावर. मला... मला विसरून जा

**संकेत**-थांब संदेश... असा भावनाविवश होऊ नकोस. अबोली तुझी आहे... फक्त तुझी. मी तयार आहे तुझ्यासाठी किडनी द्यायला.

**संदेश**-हा तुझा मोठेपणा आहे संकेत! आपण तिघेही दुःखी होण्यापेक्षा मीच तुमच्यापासून दूर होतो.

**संकेत**-संदेश मी हा फटीचर, बेकार, दरिद्री मी तीला काय सुख देणार. तुम्ही सुखी व्हा. आज तिचा वाढदिवस आहे ही अशी भेट देणार.

**संदेश**-अबोली, तुला माझ्या कडून ही छोटीशी भेट.

**अबोली**-काय आहे हे? हे काय? म...म.... मृत्युपत्र

**संकेत**-मृत्युपत्र ? म्हणजे ?

**अबोली**-संदेश, तू मला हे...

**संदेश**-होय संकेत, अबोली.... माझं मृत्यूपत्र मी कदम वकिलांना सर्व सांगितलयं..... अबोलीला पुन्हा अनाथ होऊ देणार नाही.

**अबोली**-नाही संदेश नाही.

**संदेश**-फक्त एक कर अबोली, माझ्या आईवडिलांना सांभाळ...

**अबोली**-(अबोली रडत आहे)

**संदेश**-अबोली,प्लीज...

**संकेत**-नको रडूस अबोली ! मी पुन्हा तिला दुःखच देणार! माझे इथे मलाच परके झाले आहेत.

**संदेश**-तू अपराधी नाही मीच आहे. मी तुमच्या सुखासाठी माझे सर्वस्व त्यागायला तयार आहे. चल आपण...

**संदेश**-पण संकेत मला नाही पटत.

**संकेत**-स्वतःसाठी जगू शकत नाही, निदान दुसऱ्यासाठी यातना मिळाली तर त्याची मजा काही औरच असते... हो ना अबोली...

**अबोली**-(असहाय्यपणे ओरडते) त्या यातनेची मजा मी तुला मिळवू देणार नाही.

**संकेत**-म्हणजे?

**संदेश**-म्हणजे काय अबोली?

**अबोली**-अरे, माझ्या आणि संदेशच्या सुखासाठी तू नाही तुझा बळी देणार.

**संकेत**-पण का?

**अबोली**-मी माझी किडनी द्यायला तयार आहे.

**संदेश**-अबोली हे काय बोलतेस?

**अबोली**-मला बोलू दे. हा विचार मी आधीच करायला हवा होता. मी तुझ्यावर प्रेम करते, मग मी का तसं करु शकत नाही. संकेत तू बोललास ते बरोबर होतं.

**संकेत**-माझा उद्देश तो नव्हता. मी तयार आहे अजूनही.

**अबोली**-संकेत तू आम्हाला विसरुन जा. मी ठरवलय.

**संदेश**-तू... तू शुद्धीवर आहेस का?

**अबोली**-प्लीज संदेश मला... मला माझं प्रेम सिद्ध करु द्या. जे आज प्रयत्न...

**संकेत**-थोडा विचार कर, अबोली

**अबोली**-नाही, मी आता कोणाचंही ऐकणार नाही. माझा विचार ठाम आहे. आत्ताच जाते मी डॉक्टरांकडे आणि किडनी डोनेट पेपर्सवर सह्या करते.

(अबोली निघते)

---

**प्रारब्ध बदलणे हा मानवाचा स्वभावधर्म आहे.**

संदेश-अबोली, अबोली थांब

संकेत-अबोली

(संदेश तिला थांबविण्याचा निष्फळ प्रयत्न करतो पण ती निघून जाते. संदेश हताशपणे वळतो. दोघं एकमेकांकडे पहात राहतात. काही काळ प्रचंड शांतता... मग दोघं हळूहळू हसू लागतात... हसणं वाढत जातं.. एकमेकांना टाळ्या देतात, हात मिळवतात.)

संदेश-सॉलिड यार... मान गये! वाह!क्या बात है रवी.

रवी-त्यात काय मोठ्ठसे? सगळं आपल्या प्लॅनिंग प्रमाणे व्यवस्थित झाले प्रकाश.

प्रकाश-रवी आयला ही आपली दूसरी केस, मला थोडं टेन्शन आलं होते. थोडा वेळ जास्त लागला खरा. एनी वे शेवटी आपल्याला हवं ते मिळालं.

रवी-पोरीनं भावनेच्या भरात निर्णय घेतला, जो आपल्याला हवा होता.

प्रकाश-यालाच म्हणतात लक.. दुनिया झुकती है...

रवी-आपल्याला हवी ती गोष्ट तिच्या गळी उतरवायला जाम कष्ट पडले यार.

प्रकाश-यार तिने किडनी बद्दल कुठल्याही वैद्यकिय गोष्टींचा विचार न करता स्वतःची किडनी डोनेट करायला गेली.

रवी-प्रकाश हे सगळं खोटं. त्यात ती चांगलीच फसली.

प्रकाश- पण रवी डॉक्टरांशी कॉन्टॅक्ट केलायस ना?

रवी-म्हणजे काय यार? तो तर तिकडे टपूनच बसला असेल. वाटच पहात असेल किडनी डोनरची आफ्टर ऑल धीस इज बिझनेस.

प्रकाश- यस! किडनीच्या किंमतीच्या फिफ्टी पर्सेंट कमिशन आहे आपलं... उद्या आपला हिस्सा मिळाला की ह्या शहरातून छू.... दुसरं शहर.... दुसरी एखादी अबोली.

रवी-त्या तिथही असाच एक डॉक्टर गाठायचा. त्याच भलं आपलं भलं....

प्रकाश-राईट! ह्या डॉक्टरांच एक बरं. चार अनाथ आश्रमातल्या हॉस्पिटलमध्ये सेवाभावी वृत्तीने मोफत सेवा करायची आणि एखादी केस गटवून आपल्याला द्यायची.

रवी-अरे अफाट पैसा सहजासहजी कमवायचा असेल तर याच ट्रिक्स् कराव्या लागतात.

प्रकाश-उद्या पासून नवीन केसच्या शोधात पण ह्या केसचा गवगवा होण्याआधी येथून निघू.

(दोघं मोठमोठ्याने हसतात. टाळ्या देतात. पार्श्वसंगीतात द्रुतगतीचा आवाज... हळूहळू अंधार दाटतो. संपूर्ण काळोखात फक्त बेसूरपणे छेडल्या जाणाऱ्या सतारीचा आवाज... प्रकाश स्पॉट लाइटमध्ये ती पाठमोरी.....अंधारात चेहरा.

ती-संकेत... संकेत मला भिती वाटतेय... किती जवळ आलो नाही आपण... या गेल्या महिन्याभरात. किती सहज, किती अलगद! आपल्याला कुणी एकमेकांपासून दूर तर नाही नारे करणार... संकेत संकेत ऐकतोहेस ना? ए संकेत.

तो-अं? क-काय? मला काही म्हणालीस? सायली? (पार्श्वभागातून ध्वनी परावर्तित होतो-सायली-सायली-सायली' ध्वनी थांबतो. हळू हळू अंधार दाटून येतो.)

(अंधारात पडदा व्यापू लागतो)

॥ समाप्त ॥

**श्री. राजेश राणे**

(प्रयोगाचे हक्क राखीव. लेखकाच्या लेखी परवानगी साठी पत्ता - ३०३, पार्वती निवास, टेकडी बंगला, ठाणे ६००४०२.)

• • •

विसंगतीतच सर्व जगाची सुसंगती भरलेली आहे.

# मार्च २०००

सौ. विशाखा देशपांडे

**सौ. ए.के. जोशी इं. मि. स्कूल**

दिनांक २५ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी २००० या कालावधीत ठाणे जिल्हा भारत स्काऊट गाईड मेळावा पी.ई. सोसायटी इंग्रजी माध्यम ठाणे पूर्व येथे आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्यात सौ. ए.के. जोशी हायस्कूलमधील १५ स्काऊटस्नी भाग घेतला होता. या तीन दिवसाच्या निवासी शिबीरात विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

ह्या स्पर्धांमध्ये स्काऊटस्ना खालील पारितोषिके मिळाली.

| | |
|---|---|
| १) सांस्कृतिक कार्यक्रम | प्रथम क्रमांक |
| २) संघकोपरा व प्रदर्शन | द्वितीय क्रमांक |
| ३) हस्तकला कौशल्य | द्वितीय क्रमांक |
| ४) चित्रकला स्पर्धा | तृतीय क्रमांक |

नावे - १) अजिंक्य काळे २) सौरभ गायकवाड ३) अक्षय देसाई ४) ई. साईनानंद ५) प्रफुल निशार ६) जगजीत खंडागळे ७) जितेंद्र पालकर ८) अतुल मोरे ९) स्वानंद महाशब्दे १०) वरुण लाखन ११) अमित प्रवार १२) साहिल पिंगळे १३) परिक्षित जोशी १४) नितीन पाटील १५) साहिल चव्हाण

धाडसी स्पर्धेत १४ स्काऊटस्ना प्रमाणपत्र बहाल करण्यात आली.

ह्या सर्व स्पर्धेत शाळेला एकूण १६ गुण मिळवून प्रथम क्रमांका बरोबरीत राहिला.

ह्या मेळाव्यासाठी जाणाऱ्या सर्व स्काऊटस्ची तयारी स्काऊट मास्टर व गाईड कॅप्टन यांनी करुन घेतली.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)**

१८ फेब्रुवारी २००० रोजी ठाणे येथे महाराष्ट्र कराटे बुडोकोन संस्थेतर्फे इंटर डोजो चॅम्पियनशीप स्पर्धा घेण्यात आली यात आपल्या शाळेतील कु. श्वेता गुरव (९अ) हिला स्पायरिंग व कातास् मधे रौप्य व कांस्य पदक प्राप्त झाले. त्याच स्पर्धेत प्रिया मोटे (९अ) हिला स्पायरिंग व कातास् मधे प्रत्येकी सुवर्ण पदक प्राप्त झाले.



प्रिया मोटे (९अ) स्पायरिंग व कातास्
दोन्हीत सुवर्ण पदक

१९९९-२००० या शालेय वर्षात झालेल्या होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत इ. ६वी च्या गटात आपल्या शाळेतील दुर्गेश अनिल देशपांडे (६अ) याला सुवर्ण पदक व रु. २५०/-ची शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

याच परीक्षेत चिन्मयी नगर्सेकर (६अ) हिला रौप्यपदक प्राप्त झाले.



दुर्गेश अनिल देशपांडे
होमी भाभा बालवैज्ञानिक सुवर्ण पदक



चिन्मयी नगर्सेकर
होमी भाभा बालवैज्ञानिक रौप्य पदक

या विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेसाठी सौ. अंजली पंडित, सौ. उज्ज्वला धोत्रे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रयोग परीक्षेसाठी सौ. उज्ज्वला धोत्रे व श्री. देवधर यांचे मागदर्शन लाभले तर मुलाखतीसाठी सौ. अपर्णा भट, सौ. धोत्रे व श्री. देवधर यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे सर्वातर्फे हार्दिक अभिनंदन !

गणित अध्यापक मंडळाने घेतलेल्या गणित प्रज्ञा परीक्षेत आपल्या शाळेतील कु. सायली संजीव श्रोत्री (५अ) हिला पदक व पारितोषिक, प्रमाणपत्र प्राप्त झाले



सायली संजीव श्रोत्री
गणित प्रज्ञा परीक्षेत पदक व पारितोषिक प्राप्त

तसेच प्रणव प्रदीप केळकर (५अ) यास प्रमाणपत्र प्राप्त झाले.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्रा. वि.)**

मंगळवार २२ फेब्रुवारी २००० रोजी अंगारकी चतुर्थी निमित्त इयत्ता ४थीच्या विद्यार्थ्यांचे गणपती अथर्वशीर्षाचे सहस्त्रावर्तन घेतले गेले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय डॉ. वा.ना. बेडेकर यांचा ८४वा वाढदिवस साजरा केला गेला. विद्यार्थ्यांना नारळीपाकाच्या वड्या दिल्या.

महाराष्ट्र कराटे ब्यूडोकॉन संस्थेतर्फे आयोजित कराटे स्पर्धेत प्राथमिक विभागातील विद्यार्थी विष्णू महाडीक व विद्या चंद्रकांत काळे यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले. दिनांक १८.२.२०००, शुक्रवार रोजी महाराष्ट्र कराटे ब्युडोकोन आयोजित दहाव्या आंतरशालेय कराटे स्पर्धेत इयत्ता २री तील कु. कमलेश नारायण बच्छाव याला काथा या प्रकारात सुवर्णपदक मिळाले.

कुमार कला केंद्रातर्फे आयोजित द्वितीय सत्रातील विविध गुणदर्शन स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्रके मिळाली.

---

टीकेमुळे चिडणे म्हणजे ती टीका योग्य होती ही गोष्ट मान्य करण्यासारखेच असते.



कु. कमलेश नारायण बच्छाव (प्रा.वि.)

शुक्रवार, दिनांक १८.२.२००० रोजी प्राथमिक शिक्षक संघाचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. समारंभात प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. सुलभा दांडेकर यांना यंदाचा महापौर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल गौरविण्यात आले. तसेच त्यांना मुख्याध्यापक पद मिळाले म्हणून सत्कार करण्यात आला. प्राथमिक विभागातील निवृत्त शिक्षकांचा समारंभात सत्कार करण्यात आला.

### तंत्रनिकेतन - जागतिक महिला दिन

सर्वत्र जागतिक महिला दिन कार्यक्रम गाजत असताना ८ मार्च २००० या दिवशी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातही हा महिला दिन साजरा केला गेला.

या वेळी सौ. वडेर (विभागप्रमुख इ.पी.एस्.) यांनी हा दिन आपणही साजरा करावा अशी कल्पना मांडली. लगेच तंत्रनिकेतनातील सर्व महिलांनी ही कल्पना उचलून घेतली. या वेळी प्राचार्य मुजुमदार यांनीही उपस्थित राहून आपला पाठिंबा व सहकार्य दर्शविले. सर्वजण त्यांच्या दैनंदिन कामात म्हणजे प्रॅक्टिकलस्, लेक्चर्स इत्यादीत मग्न असतात. वार्षिक मीटिंग अशा क्वचित प्रसंगी सर्व स्टाफ एकत्र येतो. यावेळी महिला दिना निमित्त एकत्र आल्याने सर्व आनंदित होते. या वेळी सर्वांनी विचारांची देवघेव केली. हा कार्यक्रम महिलांसाठीच मर्यादित होता. या कार्यक्रमाची सांगता चहापानाने झाली. आपल्यासाठी हा दिवस आहे यामुळे सर्व महिला स्टाफ वर्ग खुषीने या कार्यक्रमात सहभागी झाला होता.

दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे यंदाही तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक्स् व इन्स्ट्रुमेंटेशन या विद्यार्थ्यांनी त्यांनी केलेल्या प्रोजेक्टचे प्रदर्शन भरविले होते. प्रोजेक्ट बघायला सर्वांना खुले आमंत्रण होते. हे प्रदर्शन २५ फेब्रुवारी २००० या दिवशी होते.

या वेळी त्या त्या प्रोजेक्टच्या गाईडनी ही प्रोजेक्ट केलेल्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांचे प्रोजेक्ट कसे काय आहेत हे अजमावले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने त्यांना उत्तरे दिली. विशेष म्हणजे ज्यांना या विषयांची माहिती नाही अशा नॉन टेक्निकल स्टाफला व प्रथमवर्षीय विद्यार्थ्यांसाठी या प्रोजेक्ट केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांना समजेल अशा भाषेत हा प्रोजेक्ट कसा केला व त्याचा उपयोग काय हे समजावले. विद्यार्थ्यांनी प्रयत्न व धडपड करून हे प्रोजेक्ट केलेले बघून खूप आनंद वाटला व त्यांचे कौतुकही वाटले. हे प्रदर्शन उत्तम व्हावे यासाठी त्या त्या प्रोजेक्टस्‌च्या गाईड म्हणजे प्राध्यापकांना व इतर स्टाफनेही खूप मेहनत घेतली. हे प्रोजेक्ट बघायला विद्यार्थी व स्टाफने उत्साहाने गर्दी केली होती. काही प्रोजेक्टस्‌ची नांवे पुढील प्रमाणे उदाहरणा दाखल देत आहे.

**PROJECT Exhibition -IE/IS-25/2/2000**

**Instrumentation Design of**

1) Control Panel
2) Temperature Transmeter
3) LVDT
4) Stepper motor control using Microprocessor.

**Industrial Electronics**

1) UPS for Cordless telephone

2) Caller Identification System.

3) Automatic Battery Chargar.

**ठाणे विधी महाविद्यालयाचे सुयश**

ठाणे विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. दिलीप लाल असवानी यांनी नुकतीच आपल्या पारितोषिकांची हॅटट्रिक साधली.



**श्री. दिलीप लाल असवानी IInd LL.B.**

प्रथम डिसेंबर १९९९ मध्ये ठाणे विधी महाविद्यालयातच झालेल्या मूटकोर्ट स्पर्धेत दिलीपने पहिला क्रमांक पटकावला तर योगेंद्र पेंडसेने दुसरा क्रमांक मिळवला.

या दोघांनाही फेब्रुवारीत TLS लॉ कॉलेज, पुणे येथे झालेया राज्यस्तरीत मूट कोर्ट स्पर्धेत ठाणे विधी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले ही स्पर्धा 'व्हि.ए. नायक स्पर्धा' म्हणून ओळखली जाते. या मध्ये या चमूने द्वितीय पारितोषिक पटकावले आणि दिलीप आसवानी यांनी "Best Advocate" पुरस्कार चषकासह पटकावला.

या नंतर नुकतीच महाराष्ट्र आणि गोवा यांनी गव्हर्मेंट लॉ कॉलेज मध्ये ५वी मूटकोर्ट स्पर्धा आयोजित केली होती. तिचे उद्घाटन मुंबई हाय-कोर्टचे उच्च न्यायमूर्ति श्री. पंड्या यांनी केले. या स्पर्धेत देखील श्री. दिलिप आसवानी आणि रोशन खोब्रागडे यांच्या संघाला प्रशस्ती पत्रक व १०००₹ चे पारितोषिक मिळाले.


ILS Law College, Pune

Principal and Faculty

Congratulate

Dilip L. Asvani

of V.P.M.S TMC Law College Thane

selection as Best Advocate in 5th

MOOT COURT

**अगण्यावर प्रेम करायला शिकवते तीच खरी कविता!**
**-संपादक मिलिंद बल्लाळ**

"अगण्यावर प्रेम करायला शिकवते तीच खरी कविता असते", असे उद्गार 'ठाणे वैभव' चे संपादक मिलिंद बल्लाळ यांनी काढले. शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या प्रा. दिगंबर भिडे यांच्या 'कवडसे' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

ते पुढे म्हणाले, 'जीवनातील प्रेम, विरह, दुःख, आनंद या अनेक भावछटा व्यक्त करून आनंदाची अनेक

बेटं निर्माण करण्यासाठी जे आपल्या लेखणीने प्रयत्न करतात तेच रसिकांवर आपला ठसा उमटवू शकतात. मागच्या पिढीत खूप वाचलेली माणसे होती. पण नव्या पिढीतील युवक वाचनाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे आशयघन कविता वाचायला मिळत नाहीत. पण प्रा. भिडे यांच्या कविता आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने उजव्या आहेत. जीवनातील सर्व छटा त्यांच्या 'कवडसे' काव्यसंग्रहात प्रगट होतात. ही अतिशय चांगली गोष्ट आहे.

प्राचार्य सदाशिव गोखले आपल्या भाषणात म्हणाले,' सध्या प्रेम दिवस साजरे करण्यासाठी विविध दिवसांचे बंधन पाळले जाते. पण, ज्यांच खरं प्रेम असत ते कुठल्याही दिवसांसाठी थांबत नाहीत. प्रा. भिडे यांनी आपलं प्रेम व्यक्त करण्यासाठी 'कवितेची' मदत घेतली. अर्थशास्त्र विषय शिकवत असूनही प्रेमभावना त्यांनी चांगल्या प्रकारे व्यक्त केलेल्या आहेत. प्रत्येकाच्या आयुष्यात कविता ओठावर असतात, तर कांहीच्या कागदावर उमटतात. या कविता रसिकांना भरभरून आनंद देतात. प्रा. भिडे यांच्या कवितांनी मला खूप आंनद दिला.'

प्रा. सिंधुताई पटवर्धन यांनीही आशीर्वादपर मार्गदर्शनपर भाषण केले. सौ. आसावरी भिडे यांचा शारदा प्रकाशनातर्फे सत्कार करण्यात आला.

समारंभासाठी कृष्णकुमार कोळी, प्रा. प्रदीप ढवळ, सौ. आसावरी भिडे, गोवर्धन भोसले, सौ. रजनी बापट, श्री. रामचंद्र भिडे, श्री. शांताराम बापू भागवत, सौ. माधुरी घारपुरे, सतीश चव्हाण, प्रा. मोहन पाठक, श्री. नारायण बारसे इत्यादि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा मोहिते, भैरवी मेहेंदळे यांनी केले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील अमित दिवाडकरचे नेत्रदिपक यश

बांदोडकर महाविद्यालयात शिकणारा अमित दिवाडकर हा विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील गणित ऑलिंपियाड परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर आठव्या तर राज्य स्तरावर पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. या परीक्षेच्या तयारीसाठी महाविद्यालयाने त्याला योग्य त्या सवलती दिल्या होत्या.

सदर परीक्षेविषयी माहिती दहावीनंतर अमितने मिळवली. अमित सिंघानिया विद्यालयाचा माजी विद्यार्थी असून शालांत परीक्षेत त्याला ८४.९३ टक्के गुण मिळाले होते. विज्ञानात ९६ टक्के तर गणितात ९३ टक्के होते. गणित ऑलिंपियाडसाठी प्रादेशिक , राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रत्येक टप्प्यासाठी ६ दीर्घोत्तरी प्रश्न विचारले जातात. त्यासाठी तीन तास वेळ असतो. ५०० विद्यार्थ्यांची या परीक्षेसाठी निवड झाली होती. आता अमित पुढील टप्प्याच्या तयारीत असून मुंबईच्या टाटा मूलभूत संस्थेत विशेष प्रशिक्षणासाठी जाणार आहे.



अमित दिवाडकर

अमितचे वडील एका कंपनीत वरिष्ठ अधिकारी आहेत. आपल्याला यश मिळवण्यामागे आईने घेतलेले कष्ट अतिशय कारणीभूत असल्याचे सांगून तो म्हणाला,'याशिवाय नातेवाईक, बोपार्डीकर सर, ध्वनिता राव मॅडम व प्राचार्य पाटील सर यांना माझ्या यशाचे श्रेय आहे. अमितची आई म्हणाली, वेळेचा सदुपयोग केला तर अनेक गोष्टी करता येतात. अमितचे व्यक्तिमत्व चौफेर आहे हे त्यामुळेच अमितला अभ्यासावरोबर बॅडमिंटनची विशेष आवड आहे. आंतरशालेय स्तरावर विभागीय पातळीपर्यंत तो खेळला आहे. ॲथलेटिक्समध्ये तर राष्ट्रीय

स्तरापर्यंत तो चमकला आहे. त्याचे वाचन चांगले असून स्वत:चा ग्रंथसंग्रह त्याने विकसित केला आहे. तो कविताही करतो. तसेच नाट्याभिनय, मेंदीभरण, रंगावली स्पर्धांमध्ये अनेक पारितोषिके त्याने प्राप्त केली आहेत. अमितला इतर विद्यार्थ्यांप्रमाणे नाणी, तिकिटे जमविण्याचा छंद आहेच पण विविध प्रकारच्या की चेन्स जमविल्या आहेत.

अमितला राष्ट्रीय स्तराप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरही यश मिळेल असा आत्मविश्वास आहे. प्राचार्य सी.जी. पाटील, उपप्राचार्य (कनिष्ठ विभाग) प्रा. मकरंद दीक्षित, उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर (पदवी विभाग) व त्याच्या प्राध्यापकांनी त्याचे विशेष अभिनंदन केले आहे.

**जोशी-बेडेकर महाविद्यालय**



कु. गीता गिरीश देव

येथील कु. गीता गिरीश देव (द्वितीय वर्ष कलाशाखा) हिला, पाडव्याच्या शुभमुहुर्तावर प्रदर्शित झालेल्या प्रा. प्रवीण दवणे लिखित व मंदार टिल्लू दिग्दर्शित 'जंतर मंतर पोरं बिलंदर' या नाटकात, प्रमुख भुमिका करण्याची संधी मिळाली आहे. या पूर्वी कामगार कल्याण केंद्रातर्फे महिला विशेष एकांकिका स्पर्धेमध्ये 'आणि त्यानंतर' या एकांकिकेतील भूमिकेबद्दल उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

**तंत्रनिकेतन वार्ता -**

**वेबसाइट-www.vpmpolytechnic.org**

मुलाखत -सौ. भारती जोशी

२१व्या शतकाकडे वळताना माहिती तंत्रज्ञानाच्या दृष्टीने अनेक बदल जगामध्ये घडून येत असलेले आपण पाहतो. हे बदल आपण आत्मसात केले नाही तर चाललेल्या स्पर्धेत टिकणे अशक्य होईल. अशी आजची परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर विद्या प्रसारक मंडळ नेहमीच चांगल्या बदलांचे स्वीकार करणारे असे आहे हा आपला नेहमीचा अनुभव.



प्रा. सौ. उषा राघवन्



प्रा. सौ. दिवाकर

या मंडळाच्याच तंत्रनिकेतनातील प्रा. सौ. उषा राघवन् व प्रा. सौ. दिवाकर यांनी या दृष्टीने विचार करून इंटरनेटच्या माहिती महामार्गावर तंत्रनिकेतनाची वेबसाइट निर्माण करून विशेष कामगिरी केलेली आहे त्या निमित्ताने त्यांची सौ. भारती जोशी यांनी मुलाखत घेऊन या वेबसाइटची माहिती वाचकांना उपलब्ध करून दिली आहे.

प्रश्न : आपल्या तंत्रनिकेतनासाठी वेबसाइट करावी हे कसे काय सूचले ?

उत्तर : एकदा इंटरनेटवर सर्फिंगकरताना इतर कॉलेजची, आ.आय.टी ची वेबसाइट बघताना असा विचार मनात आला की आपलीही वेबसाइट असावी. मनातील विचार उपप्राचार्य श्री. नायक यांना सांगितल्यावर त्यांनी यावर काम करण्यास सांगितले. तसेच प्राचार्य सी.जी. मुजुमदार यांनीही लगेच विभाग प्रमुखांची मीटिंग घेऊन त्या त्या विभागाने आपली माहिती द्यावी असे सांगितले व हळू हळू एक मूर्त स्वरूप साकारायला सुरुवात झाली.

प्रश्नः ह्या वेबसाइटसाठी जमवाजमव कशी काय केली ? किंवा काय काय यासाठी प्रयत्न करावे लागले.

उत्तरः प्रथम म्हणजे ह्या वेबसाइटसाठी रजिस्ट्रेशन फी भरावी लागली. यामुळे आपल्या वेबसाइटला नाव मिळते. तसेच या रजिस्ट्रेशन मुळे होस्टिंग(Reservation of Memory Space) ही होऊ शकते.

प्रत्येक विभागाची माहिती, त्या त्या विभागात असलेल्या अनुभवी प्राध्यापकांची नावे, सुसज्ज व सर्व साधने उपलब्ध असलेल्या प्रयोगशाळांची माहिती या वेबसाइटमध्ये मिळू शकेल असा प्रयत्न केला आहे.

तसेच माजी विद्यार्थ्यांसाठी असोसिएशन जी स्थापन केली आहे त्यासाठी ऑन लाईन रजिस्ट्रेशन केले आहे. त्यामुळे ते सोईस्कर ठरू शकते.

ग्रंथालयासंबंधी माहिती व सवलती याबद्दलही माहिती दिली आहे. ई-मेल द्वारा ग्रंथपालाला संपर्क साधण्यासाठी ई-मेल पत्ताही देण्यात येणार आहे. आम्ही (प्रा. सौ. राघवन व प्रा. सौ. दिवाकर) सर्व विभागांसाठी काय Format असावा याबद्दल चर्चा करून तो ठरविला व नंतर याबाबत चर्चा करून तो ठरविला व नंतर याबाबत $S_3$ कॉम्पुटर्स-ठाणे यांनी यासाठी मदत केली.

प्रश्नः या वेबसाइटचा उपयोग काय ?

उत्तर : या वेबसाइट विषयी एक महत्त्वाचे म्हणजे ही वेबसाइट ज्याला या वेबसाइटचा पत्ता माहित आहे त्यांनाच ही बघायला मिळेल. Search मध्ये जाऊन तुम्ही ही बघू शकत नाही. कारण त्यासाठीही रजिस्ट्रेशन करावे लागते व ते आपण केलेले नाही.

कंपन्यांसाठी जर तंत्रनिकेतनात त्यांच्या लोकांना ट्रेनिंगसाठी पाठवायचे असले ते याबाबत संपर्क साधू शकतात. तसेच ज्यांना या तंत्रनिकेतनाविषयी माहिती हवी असेल तर त्यांना ही माहिती मिळू शकते. शिवाय तंत्रनिकेतनात असलेला ऑडिओ-व्हिज्युअल हॉल जर सेमिनार साठी इ. साठी हवा असेल तर ह्या ॲड्रेसवरून बुकींगही करता येईल तसेच डिप्लोमा विद्यार्थ्यांना जर डिग्रीला जायचे असले तर त्या त्या कॉलेजची माहिती, कोर्सेसही माहिती यांत मिळेल.

अजूनही यांत काही माहिती समाविष्ट करण्याचा प्रयत्न चालू आहे. आपली वेबसाइट आपल्या कॅम्पसमधे व ज्यांना आपला वेबसाइटचा पत्ता माहित असेल त्यांनाही जरूर बघता येईल. अर्थात त्यासाठी तुमच्याकडे इंटरनेट असणे आवश्यक आहे. ही वेबसाइट Infraltive नाही informative तर आहे. ही वेबसाइट करताना तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सी.जी.मुजुमदार व उपप्राचार्य श्री. नायक यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व विभाग प्रमुख यांचीही माहिती बाबत मदत झाली. महत्त्वाचे म्हणजे विद्या प्रसारक मंडळानेही याबाबत सहकार्य दिल्याने हे काम पूर्ण करता आले.

ही वेबसाइट तयार करण्याचे प्रा. सौ. राघवन व प्रा. सौ. दिवाकर यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले ते २५-२-२००० या दिवशी. या वेळी आपल्या www.vpmpolytechnic.org या वेबसाइटचे उद्घाटन प्रा. जी.एस्. पाटील सहसंचालक, तंत्रशिक्षण, मुंबई रीजन यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर अध्यक्षस्थानी होते. तसेच कार्याध्यक्ष श्री. टिल्लू व माननीय सभासद श्री. मराठे हे ही या प्रसंगी उपस्थित होते. या पुढे विद्या प्रसारक मंडळाची स्वतःची वेबसाइट असेल व त्याचा पत्ता असेल www.vmppolytechnic.org तंत्रनिकेतनातील भविष्यातील प्रागतिक अशा घडामोडींचा श्रीगणेशा आमच्या वेबसाइटच्या उद्घाटनाने झाला आहे. त्या दृष्टीने तंत्रनिकेतनातील परिवारांतील आम्हा सर्वांना भविष्यातील वाटाच जणू उघड्या झाल्या आहेत.

## vpm's polytechnic

**About Us......**

VPM's Polytechnic is located on 13.5 acres of Creek land named as Dnyandweep, donated by the Government of Maharashtra.

more

**Infrastructure & Facilities..........**

The college has four departments with well equipped facilities....

more

**Academics......**

Identifying the latest industrial & commercial activities, the polytechnic offers full time Diploma courses....

more

**Admission.........**

For detailed information about criteria, procedure, Scholarships, etc......

more

**Administration....**

The Principal is the incharge of over all activities of the college

more

**Alumni....**

About 300 students members have formed the old student association.

more

**Administration**

**Other Activities....**

Apart from studies, the students have plenty to look forward to, a number of seminars on Personality Development & Entrepreneurship Development are organized....

more

**Professional Organizational Membership**

The Institute has got chapter of Indian Society for Technical Education, International Society for Measurement and Control....

more

© PCC,2000

This site has been for 800x600 resolution.
Please mail us at I pccwebmaster@usa.net.

• • •

हार्दिक शुभेच्छा !

आपल्या विश्वासाची,
प्रथम पसंतीची !



मुख्य कार्यालय :
सेवाधाम, डॉ. मुस रोड, लालबाग,
ठाणे-४०० ६०२.

ठाणे जनता सहकारी बँक लि
शेड्युल बँक

e-mail : tjsb@bom5.vsnl.net.in
Website : http:www.thanejanta.co.in

जो रोग बरा करता येत नाही तो मुकाट्याने सहन करावा हेच उत्तम